POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष-०५ ● अंक-२४८ ● मुंबई, शनिवार, ११ एप्रिल २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## बळजबरी धर्मांतर अन् अत्याचाराच्या 9 घटना

- गुन्हा १ : जुलै २०२२ ते फेब्रुवारी २०२६ या कालावधीत नामांकित बहुराष्ट्रीय कंपनीत काम करणाऱ्या संशयित दानिश शेख, तौसिफ अत्तार, निदा खान यांनी त्याच कंपनीत काम करणाऱ्या पीडितेच्या धर्मातील देवतांबद्दल आक्षेपार्ह बाबी सांगितल्या. पीडितेच्या धार्मिक भावना दुखावून तौसिफने लग्नाचे वचन देत वेळोवेळी शारीरिक संबंध ठेवले. यासह दानिशने पीडितेला कंपनीच्या ऑफिस, लॉबीमध्ये पकडून लैंगिक शोषण केले.
- गुन्हा २ : मे २०२३ ते १९ मार्च २०२६ या कालावधीत संशयित रझा मेमन, शाहरुख कुरेशी हे कंपनीत काम करणाऱ्या महिलेकडे रोखून बघत पीडितेला स्पर्श करीत तिच्या वैवाहिक आयुष्याबद्दल लज्जास्पद टिपण्णी केली. पीडितेने कंपनीच्या 'हेड ऑफिसर'कडे वारंवार तोंडी तक्रारी केल्या. मात्र, विनयभंगाच्या तक्रारीची दखल न घेता संशयितांच्या कृत्याला चिथावणी देण्यात आली.
- गुन्हा ३ : सन २०२२ ते फेब्रुवारी २०२६ या कालावधीत संशयित शफी शेख याने कंपनीच्या मीटिंगमध्ये पीडितेकडे एकटक बघत तिच्या मनास लज्जा उत्पन्न केली. संशयित तौसिफ याने पीडितेच्या वैयक्तिक आयुष्यात संतती नसल्याबाबत लज्जास्पद बोलून तिच्याशी जवळीक साधण्याचा प्रयत्न केला.
- गुन्हा ४ : मे २०२५ ते डिसेंबर २०२५ या कालावधीत संशयित तौसिफ अत्तारने पीडितेच्या खासगी आयुष्याबाबत लज्जास्पद गोष्टी विचारल्या. अश्लील वर्तनही केले. ऑफिसमध्ये पीडितेसह इतर मुली काम करीत असताना धार्मिक भावना दुखावल्या.
- गुन्हा ५ : सन २०२२ ते २३ मार्च २०२६ या कालावधीत संशयित तौसिफ अत्तार, दानिश, शाहरुख शेख, रझा मेमन यांनी पीडित तरुणाच्या धर्मातील देवांबद्दल अपशब्द बोलून जबरदस्तीने प्रार्थना करण्यास भाग पाडले. तरुणाला बळजबरीने मांसाहार करण्यास भाग पाडून धर्मांतराचा प्रयत्न केला.
- गुन्हा ६ : सप्टेंबर २०२४ ते फेब्रुवारी २०२६ या कालावधीत संशयित आसिफ अन्सारी, शफी शेख यांनी पीडितेच्या शरीरावरून अश्लील बोलून जाणीवपूर्वक तिच्या पायाला, छातीला स्पर्श करून लज्जास्पद वर्तन केले. तौसिफने पीडितेच्या देवतांबद्दल आक्षेपार्ह टिपणी केली.
- गुन्हा ७ : जून २०२५ ते मार्च २०२६ या कालावधीत संशयित आसिफ अन्सारी, शाहरुख कुरेशी, रझा मेनन, तौसिफ अत्तार, शफी शेख यांनी पीडितेचा पाठलाग करून अश्लील शेरेबाजी व विनयभंग केला. पीडितेच्या धार्मिक भावना दुखावल्या.
- गुन्हा ८ : जानेवारी २०२५ ते आतापर्यंत संशयित रझा मेमन, शफी शेख यांनी पीडितेची इच्छा नसताना शारीरिक जवळीक निर्माण करण्यासाठी तिच्याशी खासगी आयुष्याबाबत संवाद साधला. शफीने पीडितेच्या इच्छेविरुद्ध प्रेमाची मागणी घालून मेमन याने शरीरावरून अश्लील संवाद साधला.
- गुन्हा ९ : जानेवारी ते १ एप्रिल २०२६ या कालावधीत संशयित रझा मेमन, शाहरुख कुरेशी यांनी पीडितेसोबत अश्लील भाष्य करून पीडितेच्या शरीरावरून अश्लील संवाद साधत विनयभंग केला.

सर्व संशयित आठवड्यातून एकदा विशिष्ट प्रकारचे अत्तर लावून कार्यालयात यायचे. धार्मिक पारंपरिक पठाणी कपडे परिधान करून डोळ्यांत सुरमा भरून एका विशिष्ट बोलीभाषेचा वापर करून सर्वांशी संवाद साधायचे. त्यातून काही पीडितांना धर्मावरून शेरेबाजी करीत स्वतःची धर्मसंस्कृती रुजवण्याचा प्रयत्न करीत असल्याचे तपासात पीडितांच्या जबाबांतून समोर आल्याचे पोलिस सूत्रांनी सांगितले.

## ‘लिप्स्टिक’ लावणं सोडलं, हिंदू तरुणींसोबत जेवणंही नाकारलं

# नाशिकच्या नामांकित कंपनीतील धर्मांतर प्रकरणाची हादरवणारी स्टोरी



### व्हॉट्सॲपवरच्या गुप्त धार्मिक ग्रूपमध्ये सावज ठरवायचे

नाशिकमधील एका बहुराष्ट्रीय आयटी कंपनीत केवळ लैंगिक शोषणच नाही, तर धार्मिक कट्टरतेचे एक भयानक जाळे पसरल्याचे खळबळजनक वास्तव समोर आले आहे. विशिष्ट धर्माच्या तरुण-तरुणींनी संगनमताने इतर धर्मीय तरुणींना 'टार्गेट' करण्यासाठी व्हॉट्सॲपवर गुप्त गट तयार केले होते, अशी धक्कादायक माहिती एसआयटी तपासात उघड झाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, या नामांकित कंपनीत विशिष्ट समुदायातील तरुण-तरुणींचा एक व्हॉट्सॲप ग्रुप सक्रिय होता. या ग्रुपवर केवळ कंपनीतील राजकारण किंवा गटबाजीच नाही, तर 'पुढचे लक्ष्य' कोणाला करायचे, यावरही चर्चा व्हायची, असा संशय पीडित तरुणींनी व्यक्त केला आहे. विशेष म्हणजे, ज्या तरुणींना जाळ्यात ओढले जायचे, त्यांच्यासाठी पुन्हा एक स्वतंत्र व्हॉट्सॲप ग्रुप बनवून त्यांचे ब्रेनवॉश केले जात असे. संशयित आरोपी तरुणींना जाळ्यात ओढण्यासाठी अत्यंत नियोजनबद्ध पावले उचलत होते. संशयित तरुण स्वतःला 'सिंगल' असल्याचे भासवून तरुणींचे कौतुक करायचे, त्यांच्याशी गोड बोलून फ्लर्टिंग करायचे आणि नंतर जेवणाच्या बहाण्याने बाहेर न्यायचे. कंपनीतील कामाचा फायदा घेत, ॒तुला हव्या त्या ठिकाणी बदली करून देतो किंवा रजा मिळवून देतो,॒ असे सांगून तरुणींना उपकृत करायचे आणि त्यातून जवळीक साधण्याचा प्रयत्न व्हायचा. ज्या तरुणींनी या आमिषांना बळी पडण्यास नकार दिला, त्यांना मानसिक त्रास दिला जायचा, ज्यामुळे अनेक तरुणींनी नोकरीचा राजीनामा दिल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

नाशिकच्या एका नामांकित बहुराष्ट्रीय आयटी कंपनीत उघडकीस आलेले लैंगिक शोषण आणि धर्मांतराचे प्रकरण आता अधिक गडद होत चालले आहे. केवळ लैंगिक शोषणच नाही, तर तरुणींचे पद्धतशीरपणे ब्रेनवॉश करून त्यांचे धर्मांतर करण्याचा मोठा 'मास्टरगेम' कंपनीत सुरू असल्याचे तपासात समोर आले आहे.

**पीडितेच्या वर्तणुकीत झालेला 'तो' बदल धक्कादायक**

तपासादरम्यान पीडित तरुणीच्या बाबतीत काही अत्यंत धक्कादायक बाबी समोर आल्या आहेत. संशयित आरोपींनी पीडितेवर अशा प्रकारे प्रभाव टाकला होता की पीडितेने सलग दोन वर्षे महिना-महिनाभर उपवास पकडण्यास सुरुवात केली होती. हिंदू मैत्रिणींनी तिला जेवणासाठी बोलावले तरी ती स्पष्ट नकार देत असे. धक्कादायक म्हणजे, पीडितेने गेल्या वर्षापासून 'लिप्स्टिक' लावणेही पूर्णपणे बंद केले होते. संशयित दानिश हा विवाहित असल्याचे पीडितेला तिच्या हिंदू टीम लीडरने अनेकदा सांगितले, तिची समजूत काढली. मात्र, संशयितांच्या जाळ्यात अडकलेल्या पीडितेला यावर विश्वासच बसत नव्हता.

**'विशिष्ट पोषाख छान दिसेल'; मानसिकतेशी खेळ**

आरोपींची कार्यपद्धती अत्यंत नियोजनबद्ध होती. यामध्ये केवळ तरुणच नाही, तर काही विशिष्ट धर्मीय तरुणींचाही समावेश होता. या तरुणी हिंदू तरुणींशी जवळीक साधून, "तुला विशिष्ट धर्माचा पोषाख छान दिसेल, एकदा ट्राय करून तर बघ" असे सांगून त्यांना मानसिकरीत्या तयार करण्याचा प्रयत्न करत असत. वेळप्रसंगी यासाठी जबरदस्तीही केली जात असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

**नऊ गुन्हे आणि रक्ळ चा तपास**

या प्रकरणात आतापर्यंत नाशिकमध्ये एकूण 9 गुन्हे दाखल झाले आहेत. (देवळाली कॅम्प 1 आणि मुंबई नाका पोलीस ठाण्यात 8 गुन्हे दाखल आहेत. पोलिसांनी आतापर्यंत 6 संशयितांना बेड्या ठोकल्या आहेत. ते सध्या एसआयटीच्या कोठडीत आहेत.

**कंपनीची 'एचआर' अधिकारी पोलिसांच्या रडारवर**

संशयितांवर गुन्हे दाखल होताच कंपनीची एचआर प्रमुख आश्विनी अशोक चैनानी ही पुण्यात पसार झाली होती. एसआयटीने तिला ताब्यात घेऊन सखोल चौकशी केली. त्यानंतर तिला कायदेशीर नोटीस देऊन सध्या सोडण्यात आले आहे. या संपूर्ण रॅकेटमध्ये कंपनी प्रशासनातील वरिष्ठ पदाधिकाऱ्यांचा किती सहभाग होता? याचा तपास आता पोलीस करत आहेत.

**टेरेसवर पकडलं, पण प्रकरण दाबले**

दरम्यान, या कंपनीत सुरू असलेल्या प्रकारचा आणखी एक पुरावा समोर आल्याची माहिती मिळत आहे. एका हिंदू तरुणीला आणि संशयित तरुणाला कंपनीच्या टेरेसवर आक्षेपार्ह स्थितीत कर्मचाऱ्यांनी पकडले होते. हे सर्व प्रकार सीसीटीव्हीत कैद होऊनही, वरिष्ठ सहकाऱ्यांच्या मदतीने ते प्रकरण दाबून टाकण्यात आले होते. या छळाला कंटाळून अनेक तरुणींनी यापूर्वीच नोकरी सोडल्याचे देखील समजते.

## मीरा-भाईंदरचा पाणीपुरवठा २४ तास बंद... पाणी जपून वापरण्याचे महापालिकेचे आवाहन



■भाईंदर। प्रतिनिधी,

मीरा रोड आणि भाईंदर परिसरातील नागरिकांना येत्या वीकेंडला पाणीटंचाईचा सामना करावा लागणार आहे. स्टेम प्राधिकरणाकडून अत्यावश्यक दुरुस्ती आणि देखभाल कामे हाती घेण्यात येणार असल्याने २४ तास पाणीपुरवठा पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार आहे.

**कधीपर्यंत पाणीपुरवठा बंद?**

महापालिकेच्या अधिकृत MBMConline या पेजवर दिलेल्या माहितीनुसार, शनिवार दि. ११ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ९ वाजल्यापासून ते रविवार दि. १२ एप्रिल सकाळी ९ वाजेपर्यंत रळएट प्राधिकरणाकडून होणारा पाणीपुरवठा पूर्णतः बंद राहणार आहे.

**एमआयडीसीचा पुरवठा सुरू**

STEMचा पुरवठा बंद असला तरी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळकडून होणारा पाणीपुरवठा नियमित सुरू राहणार आहे. मात्र शहरातील मोठा पाणीपुरवठा STEMमार्फत होत असल्याने अनेक भागांत पाण्याचा दाब कमी राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

**काही भागांत विलंब आणि कमी पुरवठा**

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, मीरा रोड आणि भाईंदरमधील काही भागांत पाणीपुरवठा उशिरा होणे किंवा मर्यादित प्रमाणात होण्याची शक्यता आहे. विशेषतः ज्या भागांत आधीच ठराविक वेळेनुसार किंवा मर्यादित पाणीपुरवठा होतो, त्या भागांवर अधिक परिणाम होऊ शकतो.

**नागरिकांना पाणी साठवण्याचे आवाहन**

या पार्श्वभूमीवर नागरिकांनी आधीच पाणी साठवून ठेवावे आणि त्याचा योग्य वापर करावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी सुरू असलेल्या दुरुस्ती कामांना सहकार्य करण्याचेही आवाहन करण्यात आले आहे.

**दीर्घकालीन सुधारणा अपेक्षित**

ही तात्पुरती बंदी अत्यावश्यक दुरुस्ती आणि पायाभूत सुविधांच्या देखभालीसाठी आवश्यक असल्याचे सांगण्यात आले आहे. या कामांमुळे भविष्यात पाणीपुरवठ्याची कार्यक्षमता सुधारण्यास मदत होईल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.



## पुण्यात एफडीएची कारवाई

## मावळमध्ये भेसळयुक्त आंबा पल्प जप्त

■पुणे। प्रतिनिधी,

उन्हाळ्यात नागरिकांना सुरक्षित अन्न मिळावे, यासाठी अन्न व औषध प्रशासनाकडून विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेदरम्यान मावळ तालुक्यातील एका ठिकाणी भेसळयुक्त आंबा पल्प तयार केल्याचा प्रकार उघडकीस आला. या कारवाईत एकूण 2 लाख 23 हजार 196 रुपये किमतीचा साठा जप्त करण्यात आला.

गोपनीय माहितीच्या आधारे पथकाने संबंधित उत्पादन युनिटवर छापा टाकला. तपासणीदरम्यान आंबा पल्प तयार करताना अधिकृत नसलेले रंग व इतर भेसळीचे घटक वापरले जात असल्याचे आढळून आले. या ठिकाणाहून आंबा पल्प, आंबा फळ तसेच साखर, गायीचे दूध आणि द्रव केशरी रंग अशा घटकांसह एकूण सहा नमुने तपासणीसाठी घेण्यात आले. या ठिकाणी साठवून ठेवलेला 3,282.9 किलो इतका 1 कोटी 61 लाख 816 किंमतीचा माल जप्त केला. नाशवंत स्वरूप लक्षात घेऊन हा साठा नष्ट करण्यात आला.

## निवृत्त पोलीस उपायुक्ताची दादागिरी... महिलांशी गैरवर्तन, सोसायटी पदाधिकाऱ्यांना मारहाण

■ठाणे। प्रतिनिधी,

कल्याण पश्चिमेतील एका उच्चभ्रू सोसायटीमध्ये एका निवृत्त पोलीस उपायुक्ताने दारूच्या नशेत धुमाकूळ घातल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे. या निवृत्त अधिकाऱ्याने महिलांशी अश्लील वर्तन करत त्यांचा विनयभंग केला असून, सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांनाही बेदम मारहाण केली आहे. ही सर्व धक्कादायक घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून, कल्याणच्या महात्मा फुले चौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

**नेमकी घटना काय?**

मिळालेल्या माहितीनुसार, ८ एप्रिल २०२६ रोजी रात्री ८:३० च्या सुमारास वल्लभ टॉवर (पौर्णिमा टॉकीज



जवळ) येथे ही घटना घडली. सोसायटीत राहणारी एक महिला आपल्या लहान मुलासह दुचाकीवरून बाहेर जाण्यासाठी पार्किंगमध्ये आली होती. यावेळी तिथेच राहणारे निवृत्त पोलीस अधिकारी बी. एल. पवार यांनी मुद्दाम आपली चारचाकी त्या महिलेच्या दुचाकीमागे उभी केली. महिलेने वारंवार हॉर्न वाजवून गाडी बाजूला घेण्याची विनंती केली, मात्र पवार यांनी गाडी हटवली नाही. उलट, त्या महिलेकडे अश्लील नजरेने पाहत तिचे चारित्र्यहनन करणारे शब्द वापरले आणि तिच्या पायाला गाडीचा धक्का लावून शिवीगाळ सुरू केली.

**सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांना मारहाण**

या वादाचा आवाज ऐकून सोसायटीचे रहिवासी आणि पदाधिकारी घटनास्थळी जमा झाले. जेव्हा त्यांनी निवृत्त अधिकाऱ्याला समजवण्याचा प्रयत्न केला, तेव्हा त्यांनी अधिकच आक्रमक होत सर्वांना अश्लील शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. यावेळी त्यांनी सोसायटीच्या सेक्रेटरीचे कान पकडून त्यांना मारहाण केली, तर चेअरमनना धक्काबुक्की केली. उपस्थित महिलांनी विरोध केला असता, आरोपीने त्यांच्याशीही असभ्य चाळे करत विनयभंग केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

**सीसीटीव्ही फुटेजमुळे गुंता वाढला**

निवृत्त अधिकाऱ्याच्या या 'दबंगगिरी'चे सर्व फुटेज सोसायटीतील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात रेकॉर्ड झाले आहे. यामध्ये ते रहिवाशांना मारहाण करताना आणि महिलांशी गैरवर्तन करताना स्पष्टपणे दिसत आहेत. घटनेनंतर संतप्त रहिवाशांनी महात्मा फुले पोलीस ठाणे गाठले. एका माजी उच्चपदस्थ पोलीस अधिकाऱ्यानेच अशा प्रकारे कायद्याचे उल्लंघन केल्याने परिसरात संताप व्यक्त होत आहे. पोलिसांनी याप्रकरणी विनयभंग, मारहाण आणि शिवीगाळीचा गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे. एका निवृत्त जबाबदार अधिकाऱ्याचे हे वागणं सध्या कल्याणात चर्चेचा विषय ठरले आहे.

## वाडीबंदर परिसरातून 451 सिलिंडरसह 40 लाखांचा मुद्देमाल जप्त

# भरारी पथकाची मोठी कारवाई



■मुंबई। प्रतिनिधी,

आखाती देशातील संघर्षामुळे सध्या देशातील गॅस सिलेंडरच्या पुरवठ्यावर परिणाम झाला आहे. गॅस सिलेंडरचा पुरवठा सुरळीत सुरू असल्याचे केंद्र सरकार सांगत असले तरी अनेक ठिकाणी गॅस सिलेंडरच्या एजन्सीसमोर नागरिकांच्या रांगा लागताना दिसत आहेत. कारण अवैध गॅस साठणूक आणि विक्री होत आहे. मात्र शिधावाटप विभागाच्या भरारी पथकाकडून अवैध गॅस साठवणूक आणि वाहतूक करण्यांविरोधात कारवाई करण्यात येत आहे. शिधावाटप विभागाच्या भरारी पथकानेआजवाडीबंदर परिसरातून 451 सिलिंडरसह 40 लाखांचा मुद्देमाल जप्त केल्याचे समोर येत आहे.

मुंबईतील शिधावाटप यंत्रणेने अवैध गॅस साठवणूक आणि वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध मोठी मोहीम यशस्वी केली आहे. नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, चंद्रकांत डांगे यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे आणि त्यांनी दिलेल्या विशेष आदेशानुसार ही धडक कारवाई करण्यात आली. या मोहिमेत वाडीबंदर ब्रीज, डोंगरी परिसरात अवैध गॅस सिलिंडरची वाहतूक करणाऱ्या 8 गाड्यांसह 451 सिलेंडर असा एकूण 40,61,716 रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, चंद्रकांत डांगे यांनी सांगितले की, जीवनावश्यक वस्तूंचा काळाबाजार किंवा अवैध साठवणूक कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतली जाणार नाही आणि अशा प्रकारची कठोर मोहीम भविष्यातही सुरू राहील, असे स्पष्ट केले आहे. दरम्यान, या मोहिमेसाठी उपनियंत्रक शिधावाटप (अंमलबजावणी), गणेश बेल्लाळे आणि उपनियंत्रक शिधावाटप (परिमंडळ ‘अ’), माधुरी शिंदे यांच्या संयुक्त मार्गदर्शनाखाली आणि स.शि.अ. प्रदीप यादव यांच्या प्रत्यक्ष नेतृत्वाखाली वाडीबंदर ब्रीज, डोंगरी परिसरात सापळा रचण्यात आला होता. कारवाई पथकात भूपेंद्र गवळी, महेश देशपांडे, राहुल साळुंखे, अभिजीत गोराणे, विश्वजित गडकरी, नानासो रणदिवे, सचिन बोरसे, अनिकेत जवळकर, विकास उभे, जितेंद्र घोलप, नामदेव पडूळकर, राहुल कोळी, महेश होळकर आणि आशिष राऊत यांचा सहभाग होता.

### एकीकडे गॅस टंचाईचे संकट तर दुसरीकडे टेम्पोमधून 27 गॅस सिलेंडर्सची चोरी... आरोपीला अटक

आखाती देशातील संघषार्मुळे सध्या देशातील नागरिकांना गॅस सिलेंडर्सच्या तुटवड्याचा सामना करावा लागत आहे. गॅस सिलेंडर मिळावा यासाठी नागरिक गॅस एजन्सीच्या बाहेर रांगा लावताना दिसत आहेत. मात्र कांदिवली पश्चिम येथे पार्क केलेल्या एका टेम्पोमधून गॅस सिलेंडर्सची चोरी झाल्याची धक्कादायक माहित समोर येत आहे. चारकोप पोलिसांनी या गुन्ह्याच्या संदर्भात एका आरोपीला अटक केली आहे. तसेच चोरीसाठी वापरलेला टेम्पो, त्यातील काही गॅस सिलिंडर्स आरोपीच्या ताब्यातून जप्त करण्यात आले आहेत. पोलिसांच्या माहितीनुसार, जप्त केलेल्या मुद्देमालाचे मूल्य 6 लाख रुपयांहून अधिक आहे, तर उर्वरित सिलिंडर्सचा शोध अजूनही सुरू आहे. मालाड पश्चिम येथील रहिवासी असलेल्या नंदकुमार सोनी यांनी चारकोप पोलीस ठाण्यात गॅस सिलेंडर्स चोरी झाल्याची तक्रार दाखल केल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. नंदकुमार सोनी यांनी दिलेल्या माहितीनुसार, 25 मार्चच्या आणि 26 मार्चच्या मध्यरात्री काका केणी चौक परिसरात पार्क केलेल्या त्यांच्या टेम्पोमधून ह्यएचपीह्ण (ल्ढ) कंपनीचे 27 गॅस सिलेंडर्स चोरीला गेले. सकाळी चोरी झाल्याचे लक्षात येताच त्यांनी तत्काळ पोलिसांना यासंदर्भात माहिती दिली. तक्रार प्राप्त होताच पोलिसांचे एक पथक घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करण्यास सुरुवात केली. फुटेजची बारकाईने तपासणी करत असताना पोलिसांनी घटनेच्या वेळी परिसरात संशयास्पदरीत्या फिरणारा एक टेम्पो पाहिला. याच दिशेने पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवली आणि त्या वाहनाचा नोंदणी क्रमांक शोधून काढण्यात यश मिळवले. तपासादरम्यान, चोरीसाठी वापरलेला टेम्पो महिंद्रा कंपनीचा ‘वेरो’ मॉडेल असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर, तांत्रिक माहिती आणि खबऱ्यांनी दिलेल्या माहितीचा वापर करून पोलिसांनी नालासोपारा परिसरात सापळा रचला आणि आरोपीला अटक केली. अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव मनोज कुमार शर्मा असून तो नालासोपारा येथील रहिवासी आहे. पोलिसांनी केलेल्या चौकशीदरम्यान आरोपीने आपणच ही चोरी केल्याची कबुली दिली. आरोपीच्या कबुली जबाबावरून पोलिसांनी गुन्ह्यात वापरलेला टेम्पो आणि चोरीला गेलेल्या 27 सिलेंडर्सपैकी 12 सिलेंडर्स त्याच्या ताब्यातून जप्त केले आहे. तसेच उर्वरित 15 सिलेंडर्सचा शोध अजूनही सुरू आहे. आरोपीने ते सिलिंडर्स विविध ठिकाणी विकून टाकल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.





# पुण्यात लाज आणणारी घटना

## कपडे बदलत असताना मुली सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद

## कामशेतच्या ‘त्या’ कपड्याच्या दुकानातील चेंजिंग रूममध्ये काय घडलं?

■मुंबई। प्रतिनिधी,

काही तरुणी एका कपड्याच्या दुकानात खरेदीसाठी गेल्या होत्या. मात्र त्या दुकानात ट्रायल रुम नव्हती. त्यामुळे दुकानदाराने त्यांना कपडे बदलण्यासाठी स्टोअर रुममध्ये जाण्यास सांगितले. मात्र या स्टोअर रुममध्ये सीसीटीव्ही कॅमेरे असल्याचे त्या मुलींना सांगण्यात आले नव्हते. मात्र ही गोष्ट मुलींच्या लक्षात आली आणि त्यांना धक्काच बसला.

**'कपडे बदलण्यासाठी स्टोअर रुम वापरा'**

ही घटना आहे पुण्याच्या कामशेत परिसरातील. येथील मुकेश फॅन्सी कॉर्नर नावाच्या कपड्याच्या दुकानात काही मुली खरेदीसाठी गेल्या होत्या. मात्र त्यांच्यासोबत पुढे काय होणार आहे याची पुसटशी कल्पनादेखील त्यांना नव्हती. दुकानात गेल्यावर त्यांनी ट्रायल रुमची चौकशी केली, मात्र त्या दुकानात ट्रायल रुमच नव्हती. त्यामुळे दुकानदार मुकेश मुथा याने कपडे बदलण्यासाठी त्यांना स्टोअर रुम वापरण्यास सांगितले. त्या मुली स्टोअर रुममध्ये गेल्या आणि कपडे बदलत असतानाच अचानक लाईट गेली. त्यामुळे अंधारात लाल दिवा चमकताना त्या मुलींना दिसला.

**स्टोअर रुममधील लाईट गेली अन्..**

हा लाल दिवा कशाचा आहे याची त्या मुलींनी बारकाईने तपासणी केली. यावेळी तो सीसीटीव्ही असल्याचे त्यांच्या लक्षात आले आणि त्यांना धक्काच बसला. यानंतर त्या मुलींनी रागाच्या भरात दुकानदाराला याचा जाब विचारला. मात्र माफी वगैरे न मागता उलट त्याने मुलींना धमकवायला सुरुवात केली. मात्र पीडित तरुणींनी हिंमत दाखवत कामशेत पोलिस ठाण्यात धाव घेतली. घडलेल्या प्रकाराविरोधात त्यांनी दुकानदार मुकेश मुथा विरोधात तक्रार दाखल केली. याप्रकरणी पोलिसांनी मुथाविरोधात भारतीय न्याय संहितेच्या कलम 77 आणि 352 विरोधात गुन्हा दाखल केला आणि त्याला अटक केली.

**पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह**

मात्र यामध्येही एक महत्त्वाची बाब आहे. ती म्हणजे एफआयआर नोंदवण्यात पोलिसांनी केलेली दिरंगाई. ही घटना घडली 16 मार्च रोजी. मात्र त्यानंतर एफआयआर नोंदवण्यास विलंब का झाला असा प्रश्न विचारला जात आहे. इतकंच नाही तर महिलांच्या सुरक्षिततेबाबतच्या या गंभीर गुन्ह्यात मुथाला इतक्या लवकर जामीन कसा मिळाला याचे उत्तरही अनुत्तरित आहेत. या प्रकरणानंतर स्थानिकांमध्ये संतापाचे वातावरण असल्याचे पहायला मिळत आहे. पोलिसांनी हे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आता होत आहे.



संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# पुन्हा चंद्राच्या दिशेने




**५३ वर्षांनी मानवाने पुन्हा चंद्राच्या दिशेने पाऊल टाकले. यावेळी 'नासा'ची 'आर्टेमिस २' ही मोहीम आहे. या मोहिमेद्वारे अंतराळवीर चांद्रप्रदक्षिणा पूर्ण करून पृथ्वीवर परतणार आहेत. १९७२ मधील अपोलो १७ मोहिमेनंतर मानवी अंतराळ प्रवासाच्या इतिहासातील ही सर्वात लांबची आणि महत्त्वाची मोहीम मानली जात आहे.**

फ्लोरिडा येथील केनेडी अंतराळ केंद्रातून 'स्पेस लॉन्च सिस्टम' (एसएलएस) या महाकाय रॉकेटच्या साहाय्याने ओरियन अंतराळयान अंतराळात झेपावले. यात कमांडर रीड वाईजमन यांच्या नेतृत्वाखालील पथकात पायलट व्हिक्टर ग्लोव्हर, मिशन स्पेशालिस्ट क्रिस्टीना कोच आणि कॅनेडियन अंतराळ संस्थेचे जेरेमी हॅन्सन यांचा समावेश आहे. क्रिस्टीना कोच यांच्याकडे आधीच सर्वात लांब एकल अंतराळ प्रवासाच्या विक्रमाची पार्श्वभूमी आहे. या मोहिमेद्वारे त्या चंद्राच्या कक्षेत पोहोचणाऱ्या पहिल्या महिला ठरल्या. हे चारही तज्ज्ञ चंद्राच्या 'फार साईड'चे म्हणजेच पृथ्वीवरून कधीही न दिसणाऱ्या भागाचे प्रत्यक्ष निरीक्षण करणार आहेत. ही मोहीम केवळ चांद्रप्रदक्षिणा नाही, तर भविष्यातील मंगळ मोहिमा आणि चंद्रावर कायमस्वरूपी मानवी वस्ती स्थापन करण्याच्या दृष्टीने एक महत्त्वाचा आधार ठरणार आहे. या मोहिमेचा मुख्य उद्देश मानवी अंतराळ प्रवासाच्या मर्यादा तपासणे आणि नवीन तंत्रज्ञानाची प्रत्यक्ष वातावरणात चाचणी करणे हा आहे. आर्टेमिस-२ ही एक 'क्रूड फ्लायबाय' मोहीम आहे. याचा अर्थ असा की, अंतराळवीर चंद्राच्या पृष्ठभागावरउतरणार नाहीत, तर चंद्राच्या मागच्या बाजूने एक विस्तीर्ण वळण घेऊन पृथ्वीवर परततील. या दहा दिवसांच्या प्रवासात ओरियन यान पृथ्वीपासून सुमारे ३,९३,००० किलोमीटर अंतरापर्यंत मजल मारेल. हे अंतर अपोलो १३ मोहिमेने प्रस्थापित केलेला विक्रम मोडीत काढणारे ठरेल. हे यान पृथ्वीपासून २.३ लाख मैल दूर जाणार आहे. पण याचा खरा उद्देश ओरियन स्पेसक्राफ्टच्या जीवन प्रणालीचा अभ्यास करणे हा आहे. ही मोहीम काढण्यामागे मुख्य कारण आहे ते २००८ मध्ये नासाने चांद्रयान मोहीम काढली होती त्यात चंद्रावर पाणी असल्याचे पुरावे दिले होते. त्याची पडताळणी करण्यासाठी ही मोहीम आखली आहे. अर्थात यावेळी त्यांच्या मोहिमेचा उद्देश चंद्रावर जाऊन झेंडा उभारण्याचा नाही. तेव्हा अमेरिका आणि रशिया यांच्यात वैज्ञानिक वर्चस्वाची लढाई होती आणि त्यात वर्चस्व कोण राखते यावर प्राणपणाला लावून ती लढाई खेळली जात असे. पण आता तो काळ मागे पडला. रशियाही आता कोसळला आणि अमेरिका जगातील सर्वात बलवान राष्ट्र राहिले नाही. आर्टिमिस हे विज्ञान आणि भू-राजकीय संघर्षात वेगळे युगाचे प्रतिनिधित्व करते. चीन आणि अमेरिकन अंतराळ स्पर्धेत चंद्र हे एकमात्र अग्रगण्य स्थान आहे. त्यासाठीच दोन्ही देशांचा संघर्ष आहे. आर्टेमिस हे जागतिक पवित्र्याबाबत व्यापक अंतराळ संशोधन आहे. या मोहिमेचा उद्देश अधिक व्यापक स्वरूपाचा आहे. चंद्रावर हिम सापडले होते आणि शास्त्रज्ञांचा अंदाज असा आहे, की चंद्रावर खड्डे आहेत आणि या हिमाचा उपयोग स्पेस स्टेशन बांधण्यासाठी करता येऊ शकतो का? तसेच चंद्रावर जीवरक्षक प्रणालीसोबत प्राणवायू आणि हायड्रोजन या वायूंचा उपयोग करून रॉकेट लॉंचर्ससाठी त्यांचा उपयोग करता येईल का? पण या मोहिमेने अमेरिकेची या अंतराळ वर्चस्वातील दादागिरी पुन्हा एकदा सिद्ध झाली आहे हे तर कबूल करावेच लागेल. अमेरिकेची स्पर्धा आता रशियाशी नाही तर चीनशी आहे, हे या निमित्तान सिद्ध झाले. कारण चीन आणि अमेरिका यांच्यातील अंतराळ स्पर्धेर्ला नवा आयाम या आर्टेमिस मोहिमेने दिला आहे. चंद्रीय अवकाशात या मोहिमेने नव्या स्पर्धेला तोंड फुटले आहे आणि अमेरिका आणि चीन यांच्यात तांत्रिक वर्चस्वासाठी जबरदस्त लढाई आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे भू-राजकीय वर्चस्वासाठीही हे युद्ध आहे. या दृष्टीनेच नासाच्या या मोहिमेकडे पाहिले पाहिजे. चंद्राचा दक्षिण ध्रुव हा या स्पर्धेचे मैदान बनला आहे आणि दोन्ही राष्ट्रे संभाव्य पाण्याच्या स्पर्धेसाठी आणि स्त्रोतांसाठी त्यात उतरली आहे. अमेरिकेने या दिशेने सुरुवात केली आहे, तर चीन २०२८-२९ मध्ये चंद्रावर उतरून आपली मोहीम पार पाडणार आहे. आर्टेमिसचे महत्त्व हे आहे, की त्यातून जास्त सुपिरियर मानवी उड्डाण क्षमता कुणाची आहे हे सिद्ध करणार आहे. त्यामुळे अंतराळात आपले प्रथम स्थान निर्माण करून त्यावर राहणे हेच अमेरिकेचे उद्दिष्ट आहे. अमेरिकेची मोहीम ही युरोप, कॅनडा आणि जपान यांच्या अंतराळ संशोधकांची मिळून बनलेली व्यापक आणि सर्वसमावेशक आहे, तर चीनची स्वतंत्र आहे.अर्थात चीनचा भागीदार रशिया आहे. आर्टेमिस यशस्वी परत आल्याने अमेरिकेचे वर्चस्व सिद्ध झाल्याने चीन या स्पर्धेत काहीसा मागे पडणार आहे. ही अंतराळ स्पर्धा केवळ द्विपक्षीय नाही, तर भारतासारख्या देशांनीही आपली ताकद अंतराळ वर्चस्वात दाखवून दिली आहे. भारताने चंद्रीय प्रदेशात आपले वर्चस्व दाखवून केवळ हे दोन देशांतील युद्ध नाही, तर बहुदेशीय आहे, हे सिद्ध केले. आर्टेमिस हे अमेरिकेसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे कारण अंतराळ संशोधनात अमेरिका यातूनच आपले पुन्हा एकदा महत्त्व प्राप्त करू शकते. चीनच्या प्रगत क्षमतांच्या संदर्भात अमेरिकेला आपली ताकद या मोहिमेद्वारे दाखवून देता येईल. आर्टेमिस ही दहा दिवसांची मोहीम असून त्यातून अमेरिका पुन्हा एकदा आपले चंद्रिय अवकाशात वर्चस्व सिद्ध करेल, तर चीनला त्याची मोहीम आणखी जोरकस करण्यासाठी प्रेरित करेल. अमेरिका आणि चीन यांच्यात आता नव्याने चंद्रासाठी स्पर्धा तयार झाली आहे आणि त्यात वर्चस्व कोण गाजवते यावर अंतराळ स्पर्धेचे भवितव्य ठरणार आहे. १९६१ मध्ये युरी गागारिन हा पहिला अंतराळ वीर ठरला होता. त्यानंतर अमेरिकेची चांद्रमोहीम झाली आणि त्यानंतर आता पुन्हा आर्टिमिस ही मोहीम पार पाडली.

# 'विश्वगुरू' भारताचे विदेश नीतीमध्ये फसलेले पाऊल

दि. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्रीच्या अंधारात अमेरिका आणि इस्रायलने एकत्रितपणे इराणवर हवाई हल्ले केले. मध्यपूर्वेत आग लागली. होर्मुझची सामुद्रधुनी बंद झाली. तेलाचे भाव गगनाला भिडले. या महाभयंकर संकटाच्या वेळी जगाने एक अत्यंत धक्कादायक, लाजिरवाणे दृश्य पाहिले पाकिस्तान मध्यस्थीचे नेतृत्व करत होता, इस्लामाबादमध्ये जगातील मोठ्या देशांचे परराष्ट्र मंत्री जमत होते आणि 'विश्वगुरू' भारत मूग गिळून बघत होता. हे एका रात्रीत घडले नाही. हे वर्षानुवर्षांच्या चुकीच्या परराष्ट्र धोरणाचे, व्यक्तिकेंद्रित मुत्सद्देगिरीचे, धोरणात्मक अंधत्वाचे आणि देशांतर्गत राजकारणासाठी राष्ट्रहिताचा बळी देण्याचे फळ आहे.

भारतीय विदेश नीतीच्या इतिहासातील सर्वात वाईट टायमिंग जर कोणते ठरले असेल तर इराणवर हल्ला होण्याच्या अवघ्या दोन दिवस आधी पंतप्रधान नरेंद्र मोदी इस्रायलला गेले. तिथे त्यांनी नेतान्याहूंसोबत 'विशेष धोरणात्मक भागीदारी' करार केला. फोटो काढले. परत आले. दोन दिवसांनंतर युद्ध सुरू झाले. याचा अर्थ भारताच्या गुप्तचर यंत्रणेला, रॉ ला, परराष्ट्र मंत्रालयाला खरोखरच या हल्ल्याची काहीच कल्पना नव्हती का? जर खरोखरच माहीत नव्हती, तर आपल्या गुप्तचर आणि विदेश नीती यंत्रणेची कठोर चौकशी व्हायला हवी. जर माहीत होते, तर मोदींनी नेतान्याहूंच्या राजकीय फायद्यासाठी भारताच्या राष्ट्रहिताचा बळी दिला, असा अर्थ होतो. नेतान्याहूंचे राजकीय अस्तित्व दोन गोष्टींवर अवलंबून होते. युद्ध सुरू राहणं आणि परदेशी नेत्यांनी त्यांना वैधता देणे. ट्रम्प यांनी पहिले दिले, मोदींनी दुसरे. भारताचे पंतप्रधान एखाद्या सहकाऱ्याची व्यक्तिगत गरज भागवण्यासाठी जगाच्या सर्वात संवेदनशील भागात, सर्वात चुकीच्या वेळी गेले. भारताच्या परराष्ट्र धोरणाची खरी समस्या ही आहे की, ते राष्ट्रहितांना या किंवा त्या जागतिक नेत्याशी असलेल्या वैयक्तिक संबंधांशी जोडतं.





भारत सध्या बघत आहे आणि जग भारताकडे बघत आहे आणि जे दिसतंय ते 'विश्वगुरू'चे चित्र नाही. भारताची विदेश नीती ही पूर्णपणे अपयशी ठरतेय आणि एस. जयशंकर यांच्या लीला भारताची प्रतिमा मलीन करतायत.

### इराणबाबत सतत चुकीची विदेश नीती

इराणचे सर्वेसर्वा खामेनी यांची हत्या झाली त्यानंतर पाच दिवसांचे लाजिरवाणं मौन बाळगणारा देश भारत होता. एका देशाचा राष्ट्रप्रमुख मग तो आवडो किंवा न आवडो; मारला गेला. हे आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन होते. जगभरातील अनेक देशांनी निषेध नोंदवला. भारताने काय केले?

पाच दिवसांनंतर परराष्ट्र सचिव विक्रम मिश्री यांनी दिल्लीत इराण दूतावासात शोकनोंद पुस्तकावर सही केली. इस्रायलला दुखवायचे नाही म्हणून एका देशाच्या राष्ट्रप्रमुखाच्या हत्येवर पाच दिवस गप्प बसणे हा भेकडपणाच आहे. हा नैतिक कायरपणाच आहे. इराणसाठी हा संदेश स्पष्ट होता, भारत आमचा मित्र नाही, तटस्थ नाही. तो दुसऱ्या बाजूचा आहे. मग भारताला मध्यस्थ म्हणून कोण स्वीकारेल?

### जयशंकरची विदेश नीती प्रत्यक्षात शून्य

एस. जयशंकर हे भारताचे परराष्ट्र मंत्री म्हणून अत्यंत बोलघेवडे आहेत. २५ मार्चच्या सर्वपक्षीय बैठकीत जयशंकर म्हणाले, 'हम उनकी तरह दलाली नहीं कर सकते'. आपण पाकिस्तानसारखी दलाली करू शकत नाही. हे एक वाक्य जयशंकरांच्या संपूर्ण कारकीर्दीवर पाणी फेरणारा क्षण होता.

नॉर्वेने ओस्लो करार घडवला ते 'दलाल' होते का? कतारने अमेरिका-तालिबान बोलणी घडवली ते 'दलाल' होते का? स्वित्झर्लंडची संपूर्ण राष्ट्रीय ओळखच मध्यस्थीवर उभी आहे ते 'दलाल' आहेत का? जयशंकरांनी केवळ पाकिस्तानचीच नाही, तर तटस्थ मुत्सद्देगिरीच्या जागतिक तत्त्वाचीच थट्टा केली. जेव्हा भारताने रशिया-युक्रेन युद्धात मध्यस्थीची ऑफर दिली होती, तेव्हा भारत कोण होता? तेव्हा ती मध्यस्थी 'दलाली' होती असे जयशंकरांना म्हणायचे का? जयशंकरांचे 'दलाल' विधान हे गंभीर परराष्ट्र धोरणाचे प्रतिबिंब नसून सोशल मीडिया आणि देशांतर्गत प्रेक्षकांसाठी केलेले 'गल्लाभरू विधान' होते.

व्हाइट हाऊसच्या तीन भेटी, ट्रम्पसोबत जेवण आणि पाकिस्तान जगाच्या दृष्टीने अचानक महत्त्वाचे राष्ट्र झाले. इस्लामाबादमध्ये उच्चस्तरीय मुत्सद्दी चर्चा आयोजित केली गेली. सौदी अरेबिया, तुर्किये आणि इजिप्तचे परराष्ट्र मंत्री इस्लामाबादला आले. फायनान्शियल टाइम्सने लिहिले की पाकिस्तानच्या लष्करी नेतृत्वाने ट्रम्पशी थेट संपर्क केला. सीएनएनने सांगितलं की अमेरिकेचे प्रस्ताव पाकिस्तानच्या माध्यमातून इराणपर्यंत पोहोचवले जात होते.

पाकिस्तानने इराणवर झालेल्या इस्रायली हल्ल्यांची निंदा केली, अयातुल्ला खामेनी यांच्या हत्येचा निषेध केला आणि त्याचवेळी अमेरिकन लष्करी तळांवर इराणी हल्ल्यांचाही निषेध केला. दोन्ही बाजूंशी संपर्क ठेवण्याचे हेच तर कौशल्य आहे. हीच तर मुत्सद्देगिरी असते!

### चाबहार बंदर कागदावरचे स्वप्न

भारताने इराणशी चाबहार बंदराचा करार केला. अफगाणिस्तान आणि मध्य आशियापर्यंत पोहोचण्याचा 'गेमचेंजर' मार्ग म्हणून याचं भरपूर कौतुक झालं. 'पाकिस्तानला बायपास करतो' असं सांगण्यात आलं. पण इराण युद्धात ओढले गेले तेव्हा काय झालं? भारत मध्यस्थीच्या उच्च टेबलावरून वगळला गेला आणि त्यामुळे चाबहार बंदर हा शून्य भू-राजकीय वजन असलेला अर्धवट व्यावसायिक प्रकल्प म्हणून उघडा पडला. पाकिस्तान मध्यस्थी करत असल्याने त्याला इराण प्रस्थापनेची सद्भावना मिळणार जी भारताने मोदींच्या इस्रायलधार्जिण्या मुत्सद्देगिरीने गमावली. म्हणजे भारताने इराणशी करार केला, पैसे ओतले, प्रकल्प उभारला, पण संबंध टिकवण्यात अपयशी झाला. यापेक्षा मोठी धोरणात्मक चूक काय असेल?


आखाती देशांमध्ये ८० लाखांहून जास्त भारतीय कामगार आहेत. त्यांचे रेमिटन्स वार्षिक $१३५ अब्ज डॉलरपेक्षा जास्त आहेत. भारत आपल्या ऊर्जेच्या बहुतांश आयातीसाठी आखाती देशांवर अवलंबून आहे. जीसीसी सोबतचा व्यापार $१८० अब्ज डॉलरवर पोहोचला आहे. आखाती देशांची गुंतवणूक भारताच्या पायाभूत सुविधांसाठी अत्यावश्यक आहे. या सगळ्यावर थेट धोका निर्माण झाला. जर भारतविरोधी भावना वाढली, तर कामगारांशी वाईट वर्तन होऊ शकते, रोजगाराच्या संधी संकुचित होऊ शकतात, रेमिटन्स कमी होऊ शकतात आणि ऊर्जेचे काय? भारताकडे केवळ २०-२५ दिवसांचा कच्च्या तेलाचा साठा आहे. होर्मुझ काही आठवडे बंद राहिले तर केवळ महागाई नाही, तर प्रत्यक्ष तुटवडा येईल. इंधन रेशनिंग, उद्योगधंदे बंद, वीज टंचाई, आर्थिक ठप्पता. इतके प्रचंड हितसंबंध असताना भारताने आखातात शांतीसाठी कोणतीही सक्रिय मुत्सद्देगिरी केली नाही हे अपराधिक दुर्लक्ष नाही तर काय आहे? भारताची खरी समस्या ही आहे की तो प्रत्येक संकटाला 'प्रेक्षक खेळ' समजतो. प्रत्येक संघर्षाकडे स्वार्थी गणनेने बघतो, शांतीच्या जागतिक नियमांशी बांधिलकी नाही. काँग्रेस नेते राहुल गांधींनी मोदींच्या परराष्ट्र धोरणाला 'विनोद' असे संबोधतात. दहा वर्षांत मोदींनी एक ठराविक परराष्ट्र धोरणाची शैली विकसित केली. परदेशी नेत्यांसोबत फोटो, 'ह्युस्टन हाऊडी मोदी'सारखे भव्य कार्यक्रम, मिठ्या, पुरस्कार. पण जेव्हा जगाला खऱ्या नेतृत्वाची, खऱ्या मध्यस्थीची, खऱ्या धाडसाची गरज होती तेव्हा जग मोदींना इस्रायल आणि अमेरिकेचं साधन म्हणून पाहत होतं, स्वतंत्र नेता म्हणून नाही.

### 'विश्वगुरू' की 'मूक प्रेक्षक'?

पाकिस्तानची उपस्थिती जितकी बोलकी आहे, तितकीच भारताची अनुपस्थिती. मोदींनी ग्लोबल साऊथचे नेतृत्व एका अशा गटाकडे सोडले जो भारताच्या हिताशी विसंगत आहे. हा थेट परिणाम आहे त्या परराष्ट्र धोरणाचा जे प्रत्यक्ष कूटनीतीपेक्षा देशांतर्गत राजकारण आणि प्रतिमा अधिक महत्त्वाची मानते. भारताला खऱ्या अर्थाने 'विश्वगुरू' व्हायचे असेल तर काही गोष्टी बदलाव्या लागतील. विदेश नीती एका व्यक्तीच्या मनमानीवर नाही, संस्थात्मक ज्ञानावर आधारित असायला हवी. जागतिक संकटात शांत राहणं 'शहाणपणा' नसतो. ती 'अनुपस्थिती' असते आणि जागतिक राजकारणात अनुपस्थित देशाला काहीच मिळत नाही.

# निर्बंधांच्या नावावर पिळवणूक












तमिळनाडूतील कल्पक्कम् येथील 'प्रोटोटाईप फास्ट ब्रीडर रिॲक्टर'ने 'क्रिटिकॅलिटी' साध्य केली आहे. ही भारतासाठी अतिशय अभिमानाची गोष्ट आहे. अणूप्रकल्प आणि त्याचे कार्य यांविषयीची वैज्ञानिक परिभाषा सामान्य लोकांना कळणे थोडे कठीण जाते. त्यातही 'एका प्रकल्पाने 'क्रिटिकॅलिटी' साध्य केल्याने आमच्या जीवनावर काय परिणाम होणार?', असा रास्त प्रश्नही उपस्थित होऊ शकतो. सोप्या भाषेत सांगायचे, तर जेव्हा एखादी अणूभट्टी 'क्रिटिकल' होते, तेव्हा 'त्यातील 'साखळी प्रक्रिया' स्वयंचलित आणि स्थिर झाली आहे', असे समजले जाते. सोप्या भाषेत ही अशी स्थिती आहे, जिथे इंधनापासून मिळणारी आणि वापरली जाणारी ऊर्जा यांचा समतोल साधला जातो. यामुळे अणूभट्टी स्थिरपणे वीजनिर्मिती करू शकते. सध्या इराण आणि अमेरिका यांच्यातील युद्धामुळे इंधनाचा जो तुटवडा निर्माण झाला, तो सर्वज्ञात आहे. त्यामुळे भारत वीजनिर्मितीच्या कक्षा रुंदावत आहे. या पार्श्वभूमीवर कल्पक्कम् येथील अणूप्रकल्पामुळे जे साध्य केले आहे, ते ऐतिहासिक आहे. भारताकडे युरेनियमचे साठे पुष्कळ अल्प आहेत. त्याचा वापर वीज आणि औषधनिर्मिती क्षेत्रांसाठी अत्यावश्यक आहे. युरेनियम अत्यल्प असल्यामुळे आपल्याला इतर देशांकडून तो आयात करावा लागतो. असे असले, तरी जगातील थोरिअमच्या एकूण साठ्यापैकी २५ टक्के साठा एकट्या भारतात आहे. सामान्य अणूभट्ट्यांमध्ये थोरिअम थेट वापरता येत नाही. 'क्रिटिकॅलिटी' प्रक्रिया साध्य करणे, म्हणजे नवीन अणूप्रकल्पात थोरिअम वापरण्याच्या दिशेने टाकलेले सर्वात मोठे पाऊल आहे. एकदा आपण थोरिअम वापरायला आरंभ केला की, भारताला वीज निर्मितीसाठी दुर्सया कोणत्याही देशावर अवलंबून रहावे लागणार नाही. या प्रक्रियेमुळे जितके इंधन अणूभट्ट्यांमध्ये वापरले जाईल, त्यापेक्षा अधिक इंधन या प्रकल्पात निर्माण होणार आहे. आतापर्यंत केवळ रशियाने अणू कार्यक्रम राबवून 'क्रिटिकॅलिटी' साध्य केली आहे. यावरून आपले शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञ यांनी या क्षेत्रात घेतलेली ही गरुडझेप आपल्या लक्षात येईल. भारताने ऊर्जाक्षेत्रात टाकलेले हे जोरकस पाऊल पहाण्यासाठी भारताच्या अणू कार्यक्रमाचे जनक डॉ. होमी भाभा हवे होते. 'युरेनियमचा तुटवडा आणि थोरियमचा मुबलक साठा' हे कोडे डॉ. भाभा यांनी वर्ष १९५४ मध्ये सोडवले होते आणि दूरदृष्टीने ऊर्जानिर्मिती क्षेत्रात स्वयंपूर्ण होण्यासाठी ३ टप्प्यांचा अणूऊर्जा कार्यक्रम राबवला होता. कल्पक्कम् प्रकल्पात जे साध्य झाले, तो अणू कार्यक्रमाचा दुसरा टप्पा होता. आज जग भारताच्या या यशाकडे आश्चर्याने पहात आहे; कारण जे प्रगत देशांना जमले नाही, ते भारताने करून दाखवले. या टप्प्यापर्यंत पोचण्याचा मार्ग हा अनेक आव्हानांनी भरलेला होता. अमेरिकेने अनेक पाश्चात्त्य देशांना हाताशी धरून 'भारताचा हा अणू कार्यक्रम अण्वस्त्रांच्या निर्मितीसाठी आहे', असा दुष्प्रचार करून या कार्यक्रमाला 'खो' घालण्याचा प्रयत्न केला. भारताने वर्ष १९७४ मध्ये पहिली अणूचाचणी केली. त्यानंतर देशावर अनेक निर्बंध लादण्यात आले. त्यानंतर वर्ष १९९८ मध्ये दुसरी अणूचाचणी केल्यावर हे निर्बंध अधिक कडक झाले. भारताची या क्षेत्रातील घोडदौड पाहून पाश्चात्त्यांचे पित्त खवळले. अणूपुरवठा गटाकडून भारतावर 'अणूप्रसार बंदी करारा'वर स्वाक्षरी करण्यासाठी दबाव आणण्यात आला. भारत याला भीक घालत नसल्याचे पाहून 'जगातील कोणत्याही देशाने भारताला युरेनियम किंवा अणूशी संबंधित कोणतीही यंत्रसामग्री विकू नये', असा नियम करण्यात आला. एवढेच कशाला? अणूभट्टीसाठी लागणारे विशेष स्टील, अतीप्रगत संगणक आणि 'फास्ट ब्रीडर रिॲक्टर'साठी लागणारे जटील भाग भारताला मिळणे बंद झाले. हे एकवेळ बनवता येईल; मात्र तंत्रज्ञानाचे काय? भारतीय शास्त्रज्ञांना परदेशात जाऊन या तंत्रज्ञानाचे शिक्षण घेण्यास किंवा तिथल्या प्रयोगशाळा वापरण्यास मनाई करण्यात आली. या निर्बंधांमुळे भारताला स्वतःचे तंत्रज्ञान विकसित करायला वेळ नक्कीच लागला; पण त्यामुळे आज भारत कुणावरही अवलंबून नाही. भारतासाठी सर्व मार्ग बंद झाले; मात्र संघटितपणे केलेले अपार कष्ट, संयम, चिकाटी आणि आत्मविश्वास यांच्या जोरावर देशाने या सर्व देशांच्या नाकावर टिच्चून यश मिळवले! या अणू कार्यक्रमात सर्वात मोठे आव्हान हे अणूभट्टीच्या रचनेच्या निर्मितीचे होते. ही रचना इतकी क्लिष्ट होती की, त्यांतील ८ विविध इमारती एकाच मोठ्या पायावर उभ्या कराव्या लागणार होत्या. मग आपले अभियंते आणि तंत्रज्ञ कामाला लागले! कल्पक्कम् येथील 'इंदिरा गांधी अणू संशोधन केंद्रा'च्या शास्त्रज्ञांनी सहस्रो रात्री जागून या अणूभट्टीचा नकाशा बनवला आणि त्यानंतर ही अणूभट्टी उभी राहिली. सोडियम वाहून नेण्यासाठी लागणारे प्रचंड मोठे पंप भारतात उपलब्ध नव्हते आणि इतर देशांनी ते देण्यास नकार दिला होता. भारतीय शास्त्रज्ञांनी हे सर्व पंप आणि यंत्रसामग्री स्वतःच विकसित केली. यामध्ये थोडी जरी चूक झाली असती, तर संपूर्ण प्रकल्प धोक्यात आला असता. भारतातील शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, अभियंता यांचा योग्य समन्वय आणि अनेक खासगी आस्थापनांनी त्यांना दिलेली साथ यांमुळे कल्पक्कम् अणूभट्टी उभी राहिली. हा प्रवास खरोखरच थरारक आणि अद्भुत होता. 'लार्सन अँड टुब्रो' या आस्थापनाने 'रिॲक्टर'चे मुख्य पात्र बनवले. हे पात्र इतके प्रचंड होते की, ते रस्त्याने वाहून नेणे अशक्य होते; म्हणून ते समुद्राच्या मार्गे कल्पक्कम्ला नेण्यात आले. हे बनवतांना १ मिलीमीटरचीही चूक चालणार नव्हती. 'वालचंदनगर इंडस्ट्रीज', 'गोदरेज' या आस्थापनांचे योगदानही विसरून चालणार नाही. ध्येय साध्य करतांना अनेक अडथळे आले, अपयश आले; मात्र ते पचवून आपले शास्त्रज्ञ आणि त्यांना साथ देणारे सर्व जण हताश न होता पुन्हा नव्या जोमाने कामाला लागले. अनेक वेळा चुकांमधून शिकून पुन्हा नव्याने कामाचा प्रारंभ करून त्यात यश मिळवले. 'देशासाठी काहीतरी करायचे आहे आणि भारताला उच्च शिखरावर नेऊन ठेवायचे आहे', या ध्येयाने प्रेरित होऊन असाध्य ते साध्य केले. सध्या चित्रपट अभिनेते, क्रिकेटपटू यांना आपल्या समाजात डोक्यावर घेतले जाते; मात्र देशासाठी कोणताही गाजावाजा न करता मूकपणे अतुल्य योगदान देणारे भारतीय शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ आणि अभियंता यांचा समाज मानसन्मान करत नाही. अशांचे मोल समजून जेव्हा त्यांचा आदर्श समाज घेईल, तेव्हा भारताचा खऱ्या अर्थाने उत्कर्ष होईल!

# राजेशाही संपली तरी रुबाब कायम!



राजेशाही ही जगातील सर्वात जुनी शासन पद्धती, राजेशाहीमध्ये राज्याचा सर्वोच्च नेता राजा किंवा राणी असते. या शासन पद्धतीमध्ये राजाचा मुलगा किंवा मुलगीच सर्वोच्च पदावर विराजमान होणार असतात. राजाचा मृत्यू झाल्यानंतर किंवा त्याने पद सोडल्यानंतर, त्याचे पद त्याच्या कुटुंबातील ज्येष्ठ मुलाकडे किंवा वारसाकडे जाते. यामध्ये जनतेद्वारे निवडणूक घेतली जात नाही, तर रक्ताच्या नात्याला महत्त्व दिले जाते. वंशपरंपरागत राजेपद मिळणे हा या शासन पद्धतीचा सर्वोच्च निकष आणि वैशिष्ट्य. प्राचीन, मध्ययुगीन काळापासून चालत आलेली राजेशाही भारतीय गणराज्य - रिपब्लिक ऑफ इंडिया स्थापन झाल्यानंतर संपुष्टात आली. अर्थात भारत स्वतंत्र झाल्यानंतर देशाने लोकांचे, लोकांनी, लोकांसाठी चालवलेले राज्य अशी व्याख्या असलेल्या लोकशाही शासन प्रणालीचा स्वीकार केला. लोकशाहीच्या माध्यमातून आज देशात आणि राज्यात अनेक राजकीय घराणी तयार झाली. आमदार, खासदारांच्या घरात जन्माला आलेल्या मुलांना आपणही राजे आहोत असा भास होऊ लागतो. त्यांच्या आसपासचे वातावरण त्यासाठी अधिक पोषक असते.

आई-वडिलांना पंतप्रधान, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्रीपदामुळे मिळणारा मान, सन्मान, सुरक्षा त्यांच्याही वाट्याला येते. माता-पित्याने लोकशाही माध्यमातून तयार केलेला मतदारसंघ, जिल्हा, प्रदेश, राज्य आपल्याच ताब्यात राहावा यासाठी राजकीय वारस प्रयत्न शील असतात, यामध्ये या वारसांचा वाटा काहीही नसतो. हे आपण निर्माण केलेलं साम्राज्य आपल्याच घरच्यांच्या ताब्यात राहावे हा नेत्यांचाही अट्टाहास असतो. कुटुंबाच्या पुण्याईवर राजकीय वारसांना आमदार, खासदार आणि मंत्रीपदही मिळते. यात त्यांची कर्तबगारी, हुशारी, कष्ट, मेहनत अनेकदा नसल्यातच जमा असते. या राजपुत्र आणि राजकन्यांचा आविर्भाव कोणत्याही राजा आणि महाराणीपेक्षा कमी नसतो. जनतेच्या नजरेतूनही तो सुटत नाही, किंबहुना अधिक खटकणारा असतो. जेव्हा जनतेच्या नजरेतून हे नेतृत्त्व उतरते तेव्हा थेट निवडणुकीच्या माध्यमातून ते कोणत्याही किमतीवर यशस्वी होत नाही, हे अनेकदा दिसून आले आहे. याचे महाराष्ट्रातील अलीकडच्या काळातील सर्वात मोठे उदाहरण एक महिला नेत्या आहेत. आता पार्थ पवारदेखील अशाच पद्धतीने वागत असल्याचे बोलले जात आहे.

बारामतीमध्ये अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर विधानसभा पोटनिवडणूक होत आहे. अजित पवार हे राज्याचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष होते. विमान अपघातात झालेल्या त्यांच्या दुर्दैवी मृत्यूनंतर होत असलेली ही पोटनिवडणूक बिनविरोध व्हावी अशी महायुतीतील सर्वच पक्षांची, त्यांच्या नेत्यांची इच्छा आहे. अजित पवारांचे ज्येष्ठ चिरंजीव आणि नवे खासदार पार्थ पवार यांनी मात्र काँग्रेस नेत्यांना फोन करून उमेदवार देऊ नका, ही विनंती करण्यास नकार दिला. उलट 'काँग्रेस कुठे होती आणि कुठे आली आहे, पुढच्या निवडणुकीत कुठे राहील हे त्यांना दिसेल' असे म्हणत देशातील सर्वात जुन्या राष्ट्रीय पक्षालाच एक प्रकारे आव्हान त्यांनी दिले.

पार्थ यांच्या वक्तव्यानंतर राज्याच्या राजकारणात जे पडसाद उमटायचे ते उमटलेच. त्यांचं वक्तव्य अपरिपक्व असल्याचे खुद्द त्यांचे आजोबा शरद पवार यांनादेखील म्हणावे लागले. पार्थ पवार नुकतेच मुंढवा जमीन घोटाळ्यातून सुटले, त्यामुळे त्यांचा खासदारकीचा मार्ग मोकळा झाला. अजित पवार गेल्यानंतरची बारामतीची ही पहिली निवडणूक. यामध्ये त्यांच्या पत्नी आणि पार्थ यांच्या मातोश्री, राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या उमेदवार आहेत. त्यांच्या बिनविरोध विजयासाठी पवार कुटुंबियांकडून काँग्रेसला एक साधा फोनही करण्यास पार्थ तयार नाहीत. यातून त्यांच्या अपरिपक्व राजकारणाची पुन्हा एकदा चर्चा होऊ लागली आहे.

पार्थ पवार हे 2019 मध्ये मावळ लोकसभा मतदारसंघातून राष्ट्रवादीचे उमेदवार होते. तेव्हा शरद पवारांनी त्यांच्या उमेदवारीला उघड विरोध केला होता. एकाच घरात किती जणांना तिकीट देणार असा त्यांचा सवाल होता. मात्र त्यानंतरही अजित पवारांनी बालहट्ट पुरवत पार्थ यांना मावळमधून उमेदवारी मिळवून दिली आणि पवार कुटुंबाला पहिला पराभूत पवार मिळाला. यानंतर पार्थ यांनी महाविकास आघाडी सरकारच्या विरोधात जात अभिनेता सुशांतसिंह राजपूत याच्या मृत्यूच्या सीबीआय चौकशीची मागणी केली होती. स्वतःच्याच पक्षाच्या सरकारविरोधातील त्यांच्या या वक्तव्याचा एकत्रित राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवारांनी खरपूस समाचार घेतला होता. माझ्या नातवाच्या मताला आम्ही कवडीचीही किंमत देत नाही ते इनमॅच्युअर आहेत, असं शरद पवार म्हणाले होते. या वक्तव्याची पुनरावृत्ती करण्याची वेळ पुन्हा एकदा पार्थ यांनी त्यांच्या आजोबांवर आणली.

अजित पवार यांचे तीन दशकांचे राजकारण राज्याने पाहिले होते. त्यांनी त्यांचं नाणं खणखणीत वाजवून सिद्ध करून दाखवले होते. त्यानंतर त्यांचा पक्षाध्यक्ष म्हणून उदय झाला. त्यामुळे स्वपक्षीयांसह इतरही नेते, पदाधिकारी, मंत्री, आमदार, खासदार, शासकीय अधिकारी, कर्मचारी हे अजितदादांचे ऐकून घेत होते. मात्र फक्त त्यांचे तुमच्याशी रक्ताचे नाते आहे म्हणून तुम्हीही त्याच तोऱ्यात वागणार, बोलणार असाल तर लोक ते सहन करणार नाहीत, हे पार्थ यांनी लक्षात घेण्याची गरज आहे. राजेशाही संपलेली असून आता राजा जनतेतून निवडला जातो, यासाठी जनतेसोबत चालण्याची गरज आहे. पार्थ पवार आणि त्यांच्यासारख्या राजकीय कुटुंबातून आलेल्या नेत्यांनी जनतेच्या भावभावना ओळखून वागणे, बोलणे आणि सहकार्यांचा आदर करणेही गरजेचे आहे. तरच येर्णाया काळात ते या लोकशाही प्रक्रियेत टिकू शकतील.

# मलाई पराठा



■ **साहित्य :** गव्हाचे पीठ- एक कप, दुधाची साय- अर्धी वाटी, मीठ- चवीनुसार, साखर- १ चमचा, तूप- २ चमचे, वेलची पावडर- १/४ चमचा.

■ **कृती :** मलाई पराठा बनवण्यासाठी सर्वप्रथम परातीत गव्हाचे पीठ घेऊन त्यात चवीनुसार मीठ आणि अर्धा चमचा तूप घाला. त्यानंतर त्यात आवश्यकतेनुसार पाणी घालून कणिक मळून घ्या. मळलेली कणिक १५ मिनिटे झाकून ठेवा. आता एका वाटीमध्ये दुधाची साय, साखर आणि वेलची पावडर टाकून मिक्स करून घ्या. कणिकेचा गोळा घेऊन जाडसर पारी लाटून त्यावर साय पसरवून घ्या. नंतर ही पारी बंद करून हलक्या हाताने लाटून घ्या. तवा गरम करून त्यावर पराठा टाकून तूप घालून दोन्ही बाजूने व्यवस्थित भाजा. सोप्या पद्धतीने बनवलेला मलाई पराठा तयार आहे.

**कुरळे केस म्हणजे कित्येक महिलांसाठी एखाद्या पर्वणीपेक्षा कमी नसते. काही महिलांचे जन्मतः केस कुरळे असतात तर काही सलोन किंवा पार्लरमध्ये जाऊन केस कुरळे करून घेतात. कुरळे केस दिसायला क्लासी लूक देणारे असले तरी त्यांची योग्यरित्या काळजी घेणेही आवश्यक आहे. तुमचेही केस कुरळे आहेत का? मग काळजी कशी माहित नाही. मग ही बातमी तुमच्यासाठी. जाणून घेऊयात, कुरळ्या केसांची काळजी कशी घ्यावी.**

# कुरळ्या केसांची काळजी कशी घ्याल?

**अशी घ्यावी काळजी -**

- सर्वात पहिले तर केसांसाठी योग्य हेअर प्रॉडक्ट निवडावेत.
- केस तुटणे, गळणे टाळण्यासाठी केसांचे योग्य हेअर केअर रुटीन फॉलो करावेत.



- कुरळे केस खूपच डॅमेज आणि ड्राय झाले असतील तर एक्सपर्टचा सल्ला घेऊन हेअर प्रॉडक्ट बदलावेत.
- केस स्वच्छ करण्यासाठी मॉइश्चरायजिंग शॅम्पू वापरावेत.
- कुरळ्या केसांसाठी ड्राय मॉइश्चरायझर, सल्फेट फ्री, शिया बटर, ग्लिसरीन असलेले शॅम्पू वापरणे फायदेशीर ठरेल.
- केसांना शॅम्पू केल्यानंतर कंडीशनिंग करणे विसरू नये.
- कंडीशनरसाठी तुम्ही हेअर एक्सपर्टचा सल्ला घेऊ शकता.
- कुरळ्या केसांना कंडीशनर वापरल्याने कोरड्या केसांची समस्या कमी होते.
- केसांना आठवड्यातून किमान २ वेळा तरी धुवावेत.
- केसांचे आरोग्य राखण्यासाठी केसांना तेल लावण्यास विसरू नये.
- केसांना तुम्ही आठवड्यातून 2 वेळा तरी तेलाने मालिश करावी.
- तुम्ही रात्रभर किंवा केस धुण्याआधी अधार्तास केसांना तेल लावू शकता.
- केसांना तुम्ही कोमट तेलाचा वापर केलात तर अधिक फायदे तुम्हाला होतील.
- कुरळ्या केसांच्या शाइनसाठी हेअर मास्कचा वापर करण्यात येतो. हेअर मास्कमुळे केसांना पोषण मिळते.
- हेअर एक्सपर्टच्या सल्लाने हेअर मास्कची निवड करावी.
- महिन्यातून दोन वेळा म्हणजेच दर 15 दिवसांनी हेअर मास्क लावावा.
- कुरळे केस रात्री झोपताना बांधून झोपावेत. रात्री मोकळे ठेवून झोपल्याने केसांमध्ये गुंता होऊ शकतो.
- कुरळे केस असतील तर झोपताना सिल्कचे कव्हर असणारी उशी झोपण्यास वापरावी.
- कुरळे केस वारंवार विंचरू नये.
- बाहेर जाताना केस झाकून ठेवावेत. यामुळे केसांमध्ये माती, धूळ जाणार नाही.

# सतत खुर्चीवर बसून काम करत असाल, तर हे वाचाच



**ऑफिसमध्ये** सतत एकाच खुर्चीवर, जागेवर बसणं शरीरासाठी नुकसानकारक आहे. अशा प्रकारच्या बसण्यामुळे त्याचा आरोग्यावर नकारात्मक, विपरीत परिणाम होत असतो. सतत टीव्ही पाहणं, कॉम्प्युटर, स्मार्टफोनवर पाहतं राहणंदेखील शरीराला नुकसान पोहोचवत असतं. काही महिन्यांपूर्वी केल्या गेलेल्या संशोधनातून याबाबत आश्चर्यचकित करणारी तथ्य समोर आली आहेत.



अमेरिकेतील मेयो येथील एका क्लीनिकमधून याबाबत संशोधन करण्यात आले. या संशोधनातून शारीरिक असक्रियता धूम्रपानाइतकीच घातक असल्याचं सांगण्यात आलं आहे.

संशोधनानुसार, खांदे, पाठ, कंबरदुखीच्या समस्येपासून ते अगदी टाइप-२च्या डायबिटीज, हृदयरोग, कॅन्सर यांसारख्या आजारांपासून स्वतःचं रक्षण करण्यासाठी चालण्या-फिरण्याचा, व्यायाम करणं आवश्यक असल्याचं म्हटलं आहे. दिवसभर बसण्याची किंवा पडून राहण्याची सवय स्मरणशक्तीसाठी घातक असल्याचीही शक्यता संशोधनातून वर्तवण्यात आली आहे.

संशोधनादरम्यान, अधिकतर युवक जवळपास ८ तासांपर्यंत खुर्चीवर बसत असल्याचं, तसंच टीव्ही किंवा मोबाईल पाहण्यासाठी एकाच जागेवर ३ तास बसून असल्याचं समोर आलं.

शारीरिक स्वास्थ्य निरोगी राखण्यासाठी, दररोज जवळपास १० हजार पाऊलं चालणं आवश्यक आहे. आठवड्यातून ६ दिवस कमीत कमी अर्धा तास व्यायाम करणं गरजेचं आहे.

**संशोधनकर्त्यांनी ऑफिसमध्ये एकाच जागी बसण्याबाबत काही उपाय सुचवले आहेत -**

- ऑफिसमध्ये पाण्याची बाटली भरून न ठेवता, तहान लागल्यास जागेवरून उठून पाणी प्यावे.
- ऑफिसमध्ये शक्य असल्यास आपल्या जागेवरच किंवा दुसऱ्या ठिकाणी स्ट्रेचिंग करावे.
- नाश्ता किंवा जेवणासाठी शक्यतो कँटिनमध्ये जावे. जागेवरच खाऊ नये.
- शक्य असल्यास लिफ्टच्या ऐवजी पायऱ्यांचा वापर करावा.



# मधुमेहींसाठी उपयुक्त पामर किंवा जांभूळ आंबा

**उन्हाळ्याचे** दिवस हे रसदार, रसाळ आंब्याचे दिवस तर पावसाळ्यात जांभळे खाण्याची मजा काही औरच. ही दोन्ही फळे ज्यांना मनापासून आवडतात त्यांना या दोन्ही फळांची चव एकाच फळात मिळाली तर? होय या दोन्ही फळांची चव एकत्र चाखण्याची संधी आता भारतीयांना साधता येणार आहे. अमेरिकेच्या फ्लोरिडा राज्यात विकसित झालेला जांभूळ आंबा, मूळ नाव पामर मँगो, आता उत्तर प्रदेशात काही ठिकाणी लावला गेला आहे. हा आंबा मधुमेहींसाठी खूपच उपयुक्त असल्याच्या बातम्या व्हायरल झाल्या आहेत.

या जातीचे सगळ्यात पहिले रोप १९२५ साली मियामी येथे लावले गेले होते. २००१ पासून या इंटरनेटवर या विशेष आंब्याची चर्चा होते आहे. ब्राझीलमध्ये या जातीच्या आंब्याचे मोठे उत्पादन घेतले जाते. आता भारतात या जातीच्या आंब्याची लागवड केली जात असल्याचे समजते. सोशल मीडियावर त्यासंदर्भात बातम्या येत आहेत.

या आंब्याचा रंग फिकट जांभळा असून जांभूळ आणि आंबा या दोन झाडांच्या संयोगातून ही जात विकसित गेली आहे असे सांगितले जात आहे. या आंब्याची चव आंबा आणि जांभूळ यांचे मिश्रण आहे.

या आंब्यात अँटीऑक्सिडंट आहेत. याच्या सेवनाने पचन सुधारते, रक्त शुद्ध होते त्यामुळे त्वचा रोग दूर होतात, रक्तशर्करेचे प्रमाण कमी होते, वजन नियंत्रणात येते असे सांगितले जाते. या आंब्याच्या जातीचे एक नाव टोमी एटकिन असे असून यातही दोन वेगळ्या जाती आहेत. अर्थात या आंब्याच्या सेवनाचे जे फायदे सांगितले जात आहेत त्याची पुष्टी केली गेलेली नाही.

**जगातील सर्वात प्रसिद्ध इन्स्टंट मेसेजिंग ॲप व्हॉट्सॲप काही दिवसांपासून नवनवीन फीचर घेऊन येत आहे. दरम्यान, थर्ड पार्टी ॲप्सच्या वापरामुळे फॅन्सी फॉण्ट्सच्या मदतीने चॅटिंगची मजा आणखी वाढणार आहे.**

# व्हॉट्सॲपवर चॅटिंगची मजा आणखी वाढणार, फॅन्सी फॉण्ट्स वापरून कसं कराल चॅटिंग?

**व्हॉट्सॲपचा** वापर आजकाल इतका वाढला आहे की जर एखाद्याला एखादी गोष्ट सांगायची असेल किंवा एखादं महत्त्वाचं डॉक्यूमेंटही पाठवायचं असेल तर आपण मी व्हॉट्सॲप करतो असंच म्हणत असतो. त्यामुळे आजकाल मेसेज पाठवण्यापासून ते कॉलिंग आणि व्हिडीओ कॉलिंग तसंच महत्त्वाची कागदपत्रं पाठवण्यासारखी सर्वच कामं व्हॉट्सॲपवर होत असतात.

आता व्हॉट्सॲपची हीच चॅटिंग आणखी भारी आणि रंगतदार होणार आहे. तर आज आम्ही तुम्हाला एक अद्भुत ट्रिक सांगत आहोत ज्यामुळे चॅटिंगची मजा द्विगुणित होईल. व्हॉट्सॲपचा फाँट बदलता येणार आहे. पण अजून तरी व्हॉट्सॲपने असे कोणतेही फीचर दिलेले नाही, त्यामुळे या कामात थर्ड पार्टी ॲप्स तुम्हाला मदत करतील. या ॲपचे नाव आहे स्टायलिश टेक्स्ट-फॉण्ट कीबोर्ड. तुम्ही हे ॲप कसे वापरू शकता ते आम्ही तुम्हाला सांगतो...

**व्हॉट्सॲपवर चॅटिंगचा फाँट कसा बदलाला?**

- सर्वप्रथम तुम्हाला प्ले स्टोअरवर जावे लागेल. त्यानंतर Stylish Text – Fonts Keyboard टाइप करा आणि हे ॲप इन्स्टॉल करा.
- डाऊनलोड केल्यानंतर, ॲप उघडा आणि स्क्रीनच्या खालील उजव्या कोपऱ्यात दिलेल्या बाणावर टॅप करा.
- त्यानंतर Agree बटण दिसल्यावर त्यावर टॅप करा.
- नंतर तळाशी उजव्या कोपऱ्यात कीबोर्ड विभागात जा.



**अनोळखी कॉल होतील म्यूट**

व्हॉट्सॲपमध्ये आणखी एक नवीन फीचर्स येणार असून समोर आलेल्या माहितीनुसार व्हॉट्सॲपमध्ये अनोळखी नंबरवरून आलेला फोन व्हॉट्सॲपवर आपोआप सायलेंट होणार आहे. हे फीचर कंपनी घेऊन येणार आहे. व्हॉट्सॲपच्या नव्या फीचर्सबद्दल माहिती देणाऱ्या WABetainfo च्या रिपोर्टनुसार ॲण्ड्रॉईड 2.23.10.7 अपडेटसोबत या फीचरला कंपनी आणणार आहे. याच्या मदतीने अनोळखी नंबरवरून येणारा फोन सायलेंट करू शकतो. अनोळखी नंबरला सायलेंट करण्यासाठीची सेटिंग व्हॉट्सॲपच्या सेटिंगमध्ये प्रायव्हसी ऑप्शनमध्ये असेल. ती सेटिंग ऑन करताच हे फीचर वापरता येईल. फोन सायलेंट झाल्यावर नंतर कळण्यासाठी हा नंबर नोटिफिकेशन आणि कॉल लॉगमध्ये नक्कीच दिसेल.

# केवळ १० मिनिटे टाळ्या वाजवण्याचे आरोग्यदायी फायदे

**हल्ली** आपण बागेत लोकांना जोरजोरात टाळ्या वाजवताना बघत असाल तेव्हा मनात विचारही करत असाल की खरंच टाळ्या वाजवल्याने आरोग्यावर सकारात्मक प्रभाव पडत असेल का? तर याचं उत्तर आहे होय... नियमित दररोज १० मिनिटे टाळी वाजवली तर हैराण करणारे परिणाम दिसून येतात. तर जाणून घ्या टाळी वाजवण्याचे काय परिणाम आहे ते....

- याने कॉलेस्ट्रॉल नियंत्रित राहतो.
- हृदयरोग आणि उच्च रक्तदाबा सारख्या गंभीर आजारांचा धोका दूर होतो.
- याने चरबी कमी होण्यास मदत मिळते ज्यामुळे वजन कमी होतं.
- यामुळे रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रणात राहते.
- रक्ताभिसरण चांगले होते.
- पचनतंत्र सुधारते ज्यामुळे बद्धकोष्ठतेची समस्या नाहीशी होते.
- याने फुफ्फुस निरोगी राहण्यास मदत मिळते.
- मानसिक ताण कमी होतो, मेंदू सक्रिय राहतं ज्यामुळे स्मरणशक्ती वाढते.
- याने शरीरात हार्मोन्स रिलीज होतात ज्यामुळे चांगली झोप लागते.
- शरीरात ऑक्सिजनचं प्रमाण वाढतं, ज्यामुळे श्वासासंबंधी आजारावर नियंत्रण राहतं.





# तेलकट त्वचेची काळजी कशी घ्याल!

- त्वचा तेलकट असल्यास क्लिन्झिंगला पर्याय नाही. क्लिन्झिंगमुळे त्वचेवर साठलेली घाण, मेकअप, मृत त्वचा नाहीसे होऊन रंध्रे मोकळी होतात. या उपायाने ब्लॅकहेड्सची समस्या दूर होते. आठवड्यातून एकदा लाईट स्क्रब केल्याने फायदा होतो.
- ऑईल फ्री फेसवॉश नियमित वापरल्यास त्वचा तेलकटमुक्त राहते. ग्लिसरीनयुक्त साबणाचा वापर करू नका.
- तांदळाच्या पिठीमध्ये पुदिन्याचा अर्क किंवा गुलाबजल मिसळून चेहऱ्यावर दहा मिनिटे हा पॅक ठेवावा. दहा मिनिटांनंतर हलक्या हाताने चोळून पॅक काढून टाकावा.
- पर्समध्ये नेहमी गुलाब अथवा लॅव्हेंडर बेस असलेलं स्किन टॉनिक ठेवा. त्याबरोबर वेट टिश्यूजही हवेत. दर दोन तासांनी यानं चेहरा स्वच्छ केल्यास त्वचा टवटवीत राहते.
- तेलकट त्वचेवर अँकनेचा त्रास होत असेल तर टी ट्री अँटी पिंपल जेल अथवा जेल मॉईश्चरायझर वापरणं चांगलं.
- त्वचेचं सीबम ऑईल नियंत्रणात ठेवण्यासाठी तेलकट आणि मसालेदार पदार्थ वर्ज्य केलेले चांगले. तैलीय ग्रंथीमध्ये संतुलन राखण्यासाठी फायबरयुक्त भोजन उपयुक्त आहे. दुपारच्या आणि रात्रीच्या जेवणात एकेक डिश सॅलड असणं अतिआवश्यक आहे.



# तांदळाचे हे आहेत अनेक फायदे



**चेहऱ्यावरील डाग दूर होतात :** चेहऱ्यावरील डाग घालवण्यासाठी उपयोगी आहे तांदूळ. तांदूळ बारीक वाटून घ्या. वाटलेल्या तांदळाच्या पिठामध्ये थोडेसे पाणी मिसळून ही पेस्ट चेहऱ्यावर हलक्या हाताने लावा. यामुळे चेहऱ्यावरील डाग दूर होतात.

**डोकेदुखीसाठी फायदेशीर :** डोकेदुखीचा त्रास होत असल्यास शिजलेल्या भाताच्या पाण्यात एक चिमूट सुंठ पावडर मिसळून डोक्यावर लावा. यामुळे डोकेदुखीपासून सुटका होते.

**जुलाबाचा त्रास होतो दूर :** जुलाबाचा त्रास होत असल्यास तांदूळ बारीक वाटून घेऊन ते पाण्यात उकळवा. यात मीठ टाकून ही पेज प्या. यामुळे जुलाबाचा त्रास कमी होतो.

**सतत तहान लागणे :** सतत तहान लागत असेल तर तांदळाचे दाणे दिवसातून दोन-तीन वेळा चावून चावून खा. यामुळे तहान लागणे कमी होते.



**प्रत्येक व्यक्तीने आपल्या आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे. चांगल्या आरोग्यासाठी रोजचा आहार आपण काय घ्यावा? याची प्रत्येकाला माहिती असायला पाहिजे. तर निरोगी राहण्यासाठी हे १० पदार्थ कच्चे खाऊ नका.**

# हे १० पदार्थ कच्चे खाऊ नका

- **राजमा :** शिजवलेला राजमा खाल्ल्याने पोटाच्या समस्या दूर होतात.
- **काजू :** कच्चे काजू पेक्षा भाजलेले काजू चवदार आणि आरोग्यासाठी फायदेशीर असतात.
- **मांस :** मांस नेहमी स्वच्छ धुवून शिजवून खाणे आरोग्यासाठी योग्य आहे.
- **टोमॅटो :** टोमॅटो कच्चे न खाता थोडेसे शिजवून खावेत. त्याने आरोग्यावर कोणतेही दुष्परिणाम होत नाहीत.
- **मूग :** मोड आलेले मूग शिजवून किंवा थोडेसे तेल टाकून भाजून खावेत. कच्चे मूग खाल्ल्याने शरीरातील रोग प्रतिकारक क्षमता कमी होते.
- **हिरव्या भाज्या :** सगळ्या हिरव्या भाज्या नेहमी स्वच्छ धुवून शिजवाव्यात किंवा थोड्याशा तेलात भाजून घेतल्याने शारीरिक समस्या होत नाहीत.
- **मशरूम :** कच्चे मशरूम शरीरासाठी धोकादायक असतात, त्यासाठी मशरूम नेहमी शिजवून घ्यावेत.
- **बदाम :** कच्च्या बदामापेक्षा भाजलेले बदाम खाण्यासाठी जास्त चवदार असतात.
- **दूध :** उकळलेलं दूध शरीरासाठी पौष्टिक असते.
- **अंडी :** चांगल्या आरोग्यासाठी अंडी उकडून खावीत.



# ॲसिडिटीचा त्रास टाळता येईल का?

कामाच्या आणि जेवणाच्याही अनियमित वेळा, धावपळीचे दैनंदिन आयुष्य, बदलती जीवनशैली, जेवणाच्या अनियमित वेळा, जागरण, बदललेले आहाराचे स्वरूप यामुळे अपचन किंवा ॲसिडिटीचा त्रास होणे हा अनेकांच्या दिनक्रमाचाच भाग बनला आहे. आम्लपित्त किंवा हायपर ॲसिडिटी होऊन छातीत जळजळणं हा सध्याच्या धावपळीच्या जीवनात जवळजवळ प्रत्येकाला छळणारा विकार असतो. अनेकदा रुग्ण 'ॲसिडिटी होतेय' हीच तक्रार घेऊन डॉक्टरकडे येतात.

पण या तक्रारीत खास ॲसिडिटीचा त्रास आहे की दुसरे काही आहे हे डॉक्टरला शोधून काढावे लागते. आपल्या आजूबाजूच्या अनेकांना हा त्रास होत असतो. छातीतील जळजळ प्रत्येकाने कधी ना कधी तरी अनुभवलेली असतेच असते, तर काही व्यक्तींची ती कायम सोबती असते. आपल्या आजूबाजूला कुटुंबात, शेजारीपाजारी अनेक जण यामुळे त्रस्त असतात. कुणाला जळजळतं, तर कुणाला मळमळतं, कुणाचे यामुळे डोके दुखते तर कुणाचे पोट दुखत असते. कधी खूप ढेकर येतात किंवा तोंडामध्ये कडवटपणा येतो. जळजळ होण्याची अनेक कारणे आहेत. त्यातील प्रमुख कारण म्हणजे ॲसिडिटी किंवा आम्लपित्त. त्यामुळे ॲसिडिटी म्हणजे काय, हा त्रास कुणाला व का होतो, त्यावर इलाज काय, हा त्रास टाळता येईल का, याबद्दल आपण जाणून घेऊ.



**ॲसिडिटी म्हणजे नेमके काय?**

आपल्या पोटात म्हणजे जठरात एक पाचक रस तयार होत असतो. तो ॲसिडिक म्हणजे आम्लयुक्त असतो. आपण जेवलेल्या अन्नाच्या पचनासाठी या पाचक रसाची अत्यंत गरज असते, पण योग्य प्रमाणात. हाच पाचक रस जर जास्त प्रमाणात निर्माण झाला किंवा अवेळी (म्हणजे जेवणाच्या वेळेव्यतिरिक्त) तयार झाला तर आम्लपित्ताचा त्रास होतो. यालाच ॲसिडिटी असे म्हणतात.

## 'ॲसिडिटी' का होते?

- पोटात जास्त प्रमाणात आणि अवेळी हा 'आम्लयुक्त पाचकरस' तयार होण्याची महत्त्वाची कारणे म्हणजे worry, hurry, curry. आयुष्य हल्ली वेगवान झाले आहे.
- सकाळी न्याहरी करण्यासाठी वेळ नसतो. मग नुसताच चहा, कॉफी इ. पेये घेतली जातात. ज्यामुळे पोटातील ॲसिड किंवा आम्लपित्त वाढते व ॲसिडिटी जाणवू लागते.
- धकाधकीच्या जीवनात प्रत्येक जण विविध मानसिक ताणाखाली वावरत आहे. अभ्यास, करिअर, कार्यालयातील कामाचा तणाव, कौटुंबिक ताणतणाव इत्यादी कारणांमुळे मज्जासंस्थेवर परिणाम होत असतो आणि त्यामुळे जठररसाची निर्मिती जास्त प्रमाणात होत राहते. ॲसिडिटीची सुरुवात होते.
- भूक लागली की रस्त्यात उभे राहून वडापाव, पावभाजी, पिझ्झा, पाणीपुरी, दाबेली इत्यादी फास्टफूड खाण्याकडे कल वाढत आहे. यातून अमिबीयासिस किंवा जियारडिआसिस सारखे संसर्ग होतात आणि यामुळे देखील ॲसिडिटी (gastritis) चा त्रास होतो.

## प्रमुख कारणे

- रात्री भरपेट जेवून तत्काळ झोपणे.
- रात्री खूप उशिरा झोपणे.
- बदलीच्या नोकऱ्यांमुळे पुरेशी झोप न होणे. अपुऱ्या झोपेमुळेही ॲसिडिटी बळावते.
- मद्यपान करणे.
- अंगदुखी, सांधेदुखी, डोकेदुखी इत्यादी कारणांसाठी वेदनाशामक औषधे सातत्याने घेणे.
- आहारात अतितेलकट, तिखट, जळजळीत मसाल्याचे पदार्थ घेतल्यानेही ॲसिडिटी वाढते.
- अतिकडक उपवास किंवा उपवासाच्या पदार्थांच्या सेवनानेही ॲसिडिटीचा त्रास होतो.
- शिळे अन्न खाल्ल्याने पोटातले आम्लपित्त वाढते आणि अपचन झाल्याने ढेकर येतात.
- भुकेपेक्षा दोन घास कमी खावेत हा आयुर्वेदाने सांगितलेला मूलमंत्र लक्षात ठेवावा. भुकेपेक्षा अधिक खाल्ल्यानेही आम्लपित्त वाढते आणि आंबट ढेकर येतात.

## लक्षणे

- जळजळ, आम्लपित्त पोटाच्या वरच्या भागात किंवा छातीत जळजळ होणे ही ॲसिडिटीची मुख्य लक्षणे आहेत. काहीही तिखट किंवा तेलकट जास्त खाल्ल्यास जळजळ होते. जेव्हा जठरात किंवा आतड्यात व्रण (अल्सर) असतो, तेव्हा प्रभावी उपाययोजना करून जळजळ नाहीशी होते. जर व्रण नसेल तर त्याला वैद्यकीय भाषेत नॉन अल्सर डीस्पेप्सिया म्हणतात. म्हणजे लक्षणे तर अल्सरची आहेत, पण एण्डोस्कोपी केल्यास अल्सर नाही. अशा रुग्णांना वारंवार हा त्रास सतावतो.
- काही वेळा जेवताना किंवा जेवणानंतर जठरातील आम्ल घशात येऊन, अन्ननलिकेत जखमा होतात.
- जठरात विशिष्ट जंतूंचा संसर्ग झाल्यास ॲसिडिटी बळावते आणि अल्सर किंवा काही गाठीसुद्धा येण्याचा संभव असतो.
- हृदयविकाराचा झटका, पित्ताशयातील खडे, पित्ताशयाची सूज, स्वादुपिंड दाह इत्यादी अनेक कारणे असण्याची शक्यता असते. या दुखण्याकडे वेळीच लक्ष न दिल्यास धोकादायक ठरू शकते.

# मानखुर्दमधील १४०० झोपड्या जमीनदोस्त

## २२ एकर सरकारी जमीन अतिक्रमणमुक्त... बीएमसी व जिल्हाधिकाऱ्यांची संयुक्त कारवाई





या कारवाईदरम्यान ७ जेसीबी आणि ३ पॉकलेन मशीनच्या सहाय्याने १४०० हून अधिक झोपड्या हटवून २२ एकर जमीन मोकळी करण्यात आली असून उर्वरित अतिक्रमण हटवण्याची प्रक्रिया सुरू आहे. तोडक कारवाईदरम्यान मानखुर्दकडून येणाऱ्या मार्गावर वाहतुकीत बदल करून काही मार्ग एकमार्गी करण्यात आले होते.

■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

गोवंडी–मानखुर्द परिसरातील सुमारे २२ एकर सरकारी जमिनीवर उभारण्यात आलेल्या सुमारे १४०० झोपड्या बुधवारी जमीनदोस्त करण्यात आल्या. मुंबई महापालिका व जिल्हाधिकारी कार्यालयाने संयुक्त कारवाई करत या बेकायदा बांधकामांविरोधात मोहीम राबवली. यावेळी मोठ्या प्रमाणावर पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

मानखुर्द शिवाजीनगर येथील २२ एकर जमिनीवरील बेकायदा बांधकामांवर बुधवारी पहाटे ३ वाजल्यापासून मुंबई महापालिकेने कारवाई सुरू केली होती. संबंधित जमीन जिल्हाधिकाऱ्यांच्या ताब्यात असून या भूखंडावर पूर्वी विविध प्रकल्पांसाठी आरक्षण टाकण्यात आले होते. काही काळ येथे साबण निर्मिती प्रकल्प उभारण्याचा प्रस्ताव होता, तर अलीकडे या ठिकाणी बाजारपेठ आणि उद्यान विकसित करण्याचा विचार करण्यात आला होता. याच पार्श्वभूमीवर अतिक्रमण हटविण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयानेही आदेश दिले होते. मात्र, याठिकाणी असलेल्या बेकायदा झोपड्या विकासकामात अडथळा ठरत होत्या.

अखेर बुधवारी १४०० झोपड्या जमीनदोस्त करण्यात आल्या. यावेळी मुंबई उपनगरचे जिल्हाधिकारी सौरभ कटियार घटनास्थळी उपस्थित होते. तसेच पोलीस उपायुक्त (परिमंडळ ६) समीर शेख यांच्या नेतृत्वाखाली मोठा पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता, ज्यामुळे संपूर्ण कारवाई शांततेत पूर्ण झाली.

कुर्ला तालुक्यातील सर्व्हे क्रमांक १/२ (भाग) या सरकारी जमिनीवर मोठ्या प्रमाणात अनधिकृत झोपड्या उभारण्यात आल्या होत्या. हे अतिक्रमण हटवण्यासाठी प्रशासनाने सर्व संबंधित विभागांना निर्देश दिले होते. या मोहिमेत अपर जिल्हाधिकारी (पूर्व उपनगर), उपजिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, पालिकेचे सहाय्यक आयुक्त (एम/पूर्व), कुर्ला तहसीलदार, सहाय्यक पोलीस आयुक्त, मानखुर्द पोलीस ठाणे आणि सार्वजनिक बांधकाम विभागासह सुमारे ४०० अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते.

**मोकळ्या जमिनीवर 'विज्ञान पार्क'**

मुंबई उपनगरचे सहपालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे मानखुर्द येथील साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे नगर येथे सरकारी जमिनीवर असलेल्या अनधिकृत तब्बल १४०० झोपड्यांवर पालिकेचा हातोडा पडला. या निष्कासित जागेवर आता नागरिकांसाठी 'विज्ञान पार्क ' उभारण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईला अधिक सुरक्षित, सुविधाजनक आणि सुंदर करण्याचा संकल्प केला आहे. या अनुषंगाने सहपालकमंत्री या नात्याने कब्जा केलेल्या सरकारी जमिनी पुन्हा मिळवण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे मंत्री लोढा यांनी यावेळी सांगितले. मुंबईला अनधिकृत बांधकामांचा विळखा पडला असून देशाची आर्थिक राजधानी मुंबईच्या सुरक्षेला धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे पडताळणी करुन सरकारी जमिनी ताब्यात घेतल्या पाहिजेत, असेही ते म्हणाले.

**विधायक उपक्रम राबवणार**

मुंबई आणि उपनगर मिळून हजारो एकर सरकारी जमिनींवर अनधिकृत बांधकामे असल्याचे शासनाच्या निदर्शनाला आले आहे. या सर्व जमिनींवरील अनधिकृत बांधकामावर कारवाई करून पुन्हा त्या जमिनी सरकारच्या ताब्यात आणण्याची कार्यवाही सुरू आहे. त्यापैकी निवडक अतिक्रमणमुक्त ५०० एकर जमिनींवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात विधायक उपक्रम राबवण्यात येणार आहे.

# पुढील 2 दिवस उष्णतेचा तडाखा

### मुंबईसह ठाणे-पालघरमध्ये तापमान वाढणार : आयएमडी



■ **मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबईसह उपनगरांमध्ये पुढील दोन दिवस तापमानात वाढ होण्याची शक्यता असून उकाडा तीव्र होणार आहे. भारतीय हवामान विभागाने याबाबत यलो अलर्ट जारी केला आहे.

**उष्ण आणि दमट हवामानाची शक्यता**

प्रादेशिक हवामान केंद्राच्या माहितीनुसार, १० आणि ११ एप्रिल रोजी मुंबई, ठाणे आणि पालघर जिल्ह्यांत उष्ण आणि दमट हवामान कायम राहण्याची शक्यता आहे. १० एप्रिल रोजी कमाल तापमान सुमारे ३५ अंश सेल्सियस तर किमान तापमान २४ अंश सेल्सियस राहण्याचा अंदाज आहे. ११ एप्रिल रोजी उष्णता वाढून तापमान ३६ अंश सेल्सियसपर्यंत जाण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

**इतर जिल्ह्यांमध्येही उष्णतेचा प्रभाव**

मुंबईसह रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांमध्येही उष्ण आणि दमट हवामान अनुभवायला मिळणार आहे. तर कोल्हापूर, सातारा, सांगली, सोलापूर, लातूर आणि धाराशिव येथे पुढील दोन दिवस हलक्या पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

**नागरिकांना काळजी घेण्याचे आवाहन**

आयएमडीने नागरिकांना काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. दुपारच्या उन्हात बाहेर पडताना उष्माघात आणि त्वचेच्या समस्या होण्याचा धोका वाढतो.

त्यामुळे नागरिकांनी दीर्घकाळ उन्हात राहणे टाळावे तसेच पुरेसे पाणी प्यावे. बाहेर पडताना सैल आणि आरामदायी कपडे घालावेत तसेच डोक्याचे संरक्षण करावे, असा सल्ला देण्यात आला आहे. चक्कर येणे, डोकेदुखी किंवा मळमळ यांसारखी लक्षणे जाणवल्यास तातडीने वैद्यकीय मदत घ्यावी, असेही सांगण्यात आले आहे.

**शेतकऱ्यांसाठीही सूचना**

दरम्यान, शेतकऱ्यांनी शेतीसाठी नियमित पाण्याची व्यवस्था (सिंचन) ठेवावी, जेणेकरून पिकांवर उष्णतेचा परिणाम कमी होईल, अशी सूचना देण्यात आली आहे.

# अकरावी प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक जाहीर

### अर्जाचा भाग एक भरता येणार



■ **मुंबई। प्रतिनिधी,**

राज्यातील अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक शिक्षण संचालनालयाने जाहीर केले आहे. शैक्षणिक वर्ष २०२६–२७ मधील इयत्ता ११वी केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेकरिता विद्यार्थ्यांना १० एप्रिल रोजी सकाळी १० वाजल्यापासून प्रवेश अजार्चा भाग १ भरून नोंदणी करता येणार आहे. तर प्रवेश अजार्चा भाग–२ भरण्याची सुविधा राज्य मंडळाचा दहावीचा निकाल जाहीर झाल्यानंतर उपलब्ध करून देण्यात येणार आहे. गतवर्षीपासून अकरावीची प्रवेश प्रक्रिया संपूर्ण राज्यात ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात येत आहे. प्रवेश प्रकियेत २०२५–२६ मध्ये अनेक अडचणी आल्या होत्या. त्यामुळे यंदा प्रवेश प्रक्रिया सुरळीत पार पडावी, यासाठी राज्य मंडळाने अकरावी प्रवेश प्रक्रियेची तयारी सुरू केली आहे. त्यानुसार दहावीचा निकाल जाहीर होण्यापूर्वीच शिक्षण संचालनालयाने अकरावी प्रवेश प्रक्रियेसाठी अर्जाचा भाग–१ भरण्याची प्रक्रिया सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.

## आंतरजातीय विवाहामुळे जैन कुटुंबावर सामाजिक बहिष्कार

# ठाण्यातील धक्कादायक प्रकार

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

ठाणे : आंतरजातीय विवाह केल्याच्या कारणावरून ठाणे शहरातील एका जैन कुटुंबावर सामाजिक बहिष्कार टाकण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी संबंधित कुटुंबाने पोलीस प्रशासन तसेच शासनाकडे धाव घेतली असली, तरी अद्याप न्याय मिळालेला नसल्याची माहिती ॲड. सागर कदम यांनी पत्रकार परिषदेत दिली. सोहनलाल छबिलाल जैन असे या बहिष्कृत कुटुंब प्रमुखाचे नाव असून ते ठाण्यातील पांचपाखाडी परिसरात वास्तव्यास आहेत. गेल्या चार महिन्यांपासून त्यांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना सामाजिक बहिष्काराचा सामना करावा लागत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सोहनलाल जैन यांचा मुलगा दिव्येश याचा विवाह ३० नोव्हेंबर रोजी श्वेतांबर समाजातील सलोनी राजेश शहा हिच्यासोबत पार पडला. हा आंतरजातीय विवाह दिगंबर जैन समाजातील काही पदाधिकाऱ्यांना मान्य नसल्याने वाद निर्माण झाला. याआधी २४ ऑगस्ट रोजी भांडूप येथे झालेल्या बैठकीत दिगंबर समाजाबाहेर विवाह करणाऱ्यांवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेण्यात आल्याचा आरोप आहे. तसेच, अशा कुटुंबांना कोणत्याही सामाजिक कार्यक्रमात सहभागी करून न घेण्याचा नियमही करण्यात आला. लग्नास उपस्थित राहिलेल्यांकडून माफीपत्र लिहून घेणे तसेच ११ हजार रुपयांचा दंड आकारण्याचे निर्देश व्हॉट्सॲप गटांद्वारे देण्यात आल्याचे सांगण्यात आले. २१ डिसेंबर रोजी झालेल्या बैठकीत सोहनलाल जैन व त्यांच्या कुटुंबावर अधिकृतपणे सामाजिक बहिष्कार जाहीर करण्यात आला.

**पोलिसांकडे तक्रार; कारवाई नाही**

या प्रकरणी सोहनलाल जैन यांनी नौपाडा पोलीस ठाणे येथे लेखी तक्रार दिली आहे. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याचा आरोप ॲड. सागर कदम यांनी केला. एकूणच, आंतरजातीय विवाहाच्या पार्श्वभूमीवर सामाजिक बहिष्कारासारख्या घटनांमुळे समाजातील वैचारिक दरी अधोरेखित होत असून, संबंधित कुटुंबाला न्याय मिळावा, अशी मागणी जोर धरत आहे.




# अख्खं गाव सुन्न... आईसह 4 मुलांना विषबाधा

## 3 चिमुकल्यांचा दुर्दैवी अंत, हृदयद्रावक घटनेने महाराष्ट्र हादरला

■ **बुलढाणा। प्रतिनिधी,**

बुलढाणा जिल्ह्यात हादरवून टाकणारी घटना समोर आली आहे. धाड येथे आज घडलेल्या दुर्दैवी घटनेमुळे संपूर्ण परिसरावर शोककळा पसरली आहे. एकाच कुटुंबातील आईसह चार मुलांना विषबाधा झाल्याचे समोर आले आहे. या घटनेच तीन लहानग्या बहीण–भावांचा मृत्यू झाला आहे. सध्या आई व एक चिमुकलीवर उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे संपूर्ण धाड परिसरावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या घटनेबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.

**विषबाधा झाल्यामुळे 3 चिमुकल्यांचा मृत्यू**

समोर आलेल्या माहितीनुसार धाड येथील



अफरीन मोहंमद वसीम जमदार (वय 34) यांच्यासह त्यांच्या 4 मुलांना विषबाधा झाल्याचे समोर आले आहे. या दुर्दैवी घटनेत मोहंमद अली मोहंमद वसीम जमदार (वय 4), मशिरा मोहंमद वसीम जमदार (वय 7) आणि फातिमा मोहंमद वसीम जमदार (वय 8) या तिघांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. तर आई अफरीन आणि मुलगी अश्मिरा वसीम जमदार (वय 3) यांच्यावर बुलढाणा येथील वेगवेगळ्या खासगी रुग्णालयांत उपचार सुरू आहेत. सर्वजन या दोघींच्या प्रकृतीत सुधारणेची प्रार्थना करत आहेत.

**अन्नातून विषबाधा झाल्याचा संशय**

सध्या अश्मिराची प्रकृती स्थिर असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली आहे. प्राथमिक माहितीनुसार, अन्नातून विषबाधा झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत असून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे. या दुर्दैवी घटनेमुळे धाड परिसरात शोककळा पसरली आहे. दरम्यान, अन्न–पाणी किंवा इतर पदार्थांमधून या कुटुंबाला विषबाधा झाली असण्याची शक्यता आहे. त्यामुळे नेहमी डॉक्टरांकडून शिळे आणि उघड्यावरचे अन्न खाणे टाळण्याचा सल्ला दिला जातो. तसेच स्वच्छ पाणी पिण्याचा सल्ला दिला जातो.

**कुटुंबातील सदस्यांना पोटदुखी, मळमळ व उलट्यांचा त्रास**

रविवारपासून या कुटुंबातील सदस्यांना पोटदुखी, मळमळ व उलट्यांचा त्रास सुरू झाला होता. आज सकाळी प्रकृती अधिक बिघडल्याने सर्वांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचारादरम्यान अली व मशिरा यांचा मृत्यू झाला. आई अफरीन यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू असताना, फातिमा व अश्मिरावर बालरोगतज्ज्ञांकडे उपचार करण्यात येत होते. सायंकाळी सुमारास फातिमा हिचाही मृत्यू झाला.

## एकाने डोळे झाकले, दुसरा रील काढत होता अन् तिसरा...

# मोठागाव–माणकोली पुलावर स्टंटबाजांच्या मुसक्या आवळल्या



■ **डोंबिवली। प्रतिनिधी,**

स्टंटबाजी आणि रिल्सच्या नादात स्वतःसह इतरांचा जीव धोक्यात घालणाऱ्या तरुणांना आता पोलिसांचा दणका बसला आहे. ठाणे–डोंबिवलीला जोडणाऱ्या माणकोली उड्डाणपुलावर चक्क डोळे झाकून दुचाकी चालवण्याचा धक्कादायक प्रकार समोर आला असून, याप्रकरणी विष्णूनगर पोलिसांनी तीन तरुणांना अटक केली आहे. माणकोली उड्डाणपूल सध्या स्टंटबाजांचा अड्डा बनला असल्याचे चित्र आहे. व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये एक तरुण भरधाव दुचाकी चालवत असताना, त्याच्या मागे बसलेल्या दुसऱ्या तरुणाने चक्क त्याचे दोन्ही डोळे हाताने झाकले आहेत. रस्ता दिसत नसतानाही केवळ सोशल मीडियावर प्रसिद्धी मिळवण्यासाठी हा तरुण बेधडकपणे गाडी चालवत असल्याचे पाहून नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला.

या स्टंटबाजीमुळे उड्डाणपुलावरून प्रवास करणाऱ्या इतर वाहनधारकांच्या जीवालाही मोठा धोका निर्माण झाला होता. या प्रकाराची दखल घेत विष्णूनगर पोलिसांनी तातडीने तपास चक्रे फिरवली आणि गणेश फोंडा रेड्डी, कबीर नेतकर आणि यश मालवणकर या २२ वर्षीय तरुणांना बेड्या ठोकल्या आहेत. रिल्सच्या वेडापायी कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांना पोलिसांनी या कारवाईतून कडक इशारा दिला आहे.

समाजमाध्यमांवरील प्रसिद्धीच्या हव्यासापोटी तरुण पिढी कोणत्या थराला जाऊ शकते, याचा संतापजनक नमुना माणकोली उड्डाणपुलावर पाहायला मिळाला. वाहतूक पोलिसांनी अनेकदा दंडात्मक कारवाई करूनही स्टंटबाजांची दहशत कमी झालेली नाही. आता तर चक्क 'डोळे झाकून' भरधाव दुचाकी चालवण्याचा एक जीवघेणा व्हिडिओ समोर आला आहे. व्हायरल झालेल्या या व्हिडिओमध्ये एका दुचाकीवर तीन तरुण बसलेले दिसत आहेत. धक्कादायक बाब म्हणजे, दुचाकी चालवणाऱ्या तरुणाचे डोळे त्याच्या मागे बसलेल्या मित्राने दोन्ही हातांनी घट्ट झाकले आहेत. रस्ता दिसत नसतानाही हा चालक मोठ्या रहदारीच्या पुलावर बिनधास्तपणे गाडी पळवत आहे, तर मागे बसलेला तिसरा तरुण या संपूर्ण 'मृत्यूपंथा'चे चित्रीकरण करण्यात मग्न आहे. पुलावर इतर वाहनांची वर्दळ सुरू असतानाही, केवळ रिल्स बनवण्यासाठी स्वतःचा आणि इतरांचा जीव धोक्यात घालणाऱ्या या स्टंटबाजांविरोधात आता कडक कारवाईची मागणी होत आहे.

**मोठागाव-माणकोली पूल बनतोय स्टंटबाजांचे रणांगण**

गेल्या काही दिवसांपासून चर्चेत असलेला मोठागाव-माणकोली उड्डाणपूल पुन्हा एकदा चुकीच्या कारणांमुळे वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. 'धुरंधर' चित्रपटाच्या चित्रीकरणामुळे प्रकाशझोतात आलेल्या या पुलावर आता नशेखोर आणि जीवघेणी स्टंटबाजी करणाऱ्या तरुणांचा सुळसुळाट वाढला आहे. काही दिवसांपूर्वी या परिसरात नशेखोरांनी उच्छाद मांडला होता, ज्यावर पोलिसांनी कडक कारवाई केली होती. मात्र, हे सत्र तिथेच थांबलेले नाही. आता भिवंडी परिसरातील काही तरुण या पुलावर आलिशान चारचाकी गाड्या घेऊन येतात आणि भरधाव वेगात स्टंटबाजी करत असल्याचे समोर आले आहे. भाजप नेते दीपेश म्हात्रे यांनी या स्टंटबाजीचा व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर करत प्रशासनाचे लक्ष वेधले. म्हात्रे यांच्या ट्विटनंतर पोलिसांनी तातडीने हालचाली करत स्टंटबाजांविरोधात कारवाईचा बडगा उगारला आहे. मात्र, पुलावर कायमस्वरूपी सुरक्षेची गरज असल्याचे मत स्थानिक नागरिक व्यक्त करत आहेत.

# आयुष्याची नवीन सुरुवात करण्यासाठी ठरवलेला दिवसच ठरला अंतिम... पोटच्या मुलानेच केली निघृण हत्या

■ **जालना। प्रतिनिधी,**

जालना जिल्ह्यामधील अंबड तालुक्यात एक धक्कादायक आणि हृदय पिळवटून टाकणारी घटना घडली आहे. पोटच्या मुलानेच आपल्या वडिलांची कुऱ्हाडीनं वार करून निर्घृण हत्या केल्याची घटना समोर आली आहे. या घटनेनं संपूर्ण परिसरात भीतीचं वातावरण आणि एकच खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आज म्हणजेच गुरुवारी ९ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ५ वाजताच्या सुमारास अंबड तालुक्यातील रुई गावात सकाळच्या सुमारास दिलीप राजगुरू (वय ४५) यांचं पार्थिव त्यांच्या राहत्या घराजवळ रक्तरंजित अवस्थेत आढळून आलं. ही बाब ग्रामस्थांच्या निदर्शनास येताच त्यांनी तत्काळ तीर्थपुरी पोलीस ठाण्याला माहिती दिली. माहिती मिळताच




पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि पंचनामा करत तपासाला सुरुवात केली. प्राथमिक तपासात दिलीप राजगुरू यांच्या डोक्यावर आणि शरीरावर कुऱ्हाडीचे गंभीर घाव असल्याचं आढळून आलं, त्यामुळे ही हत्या असल्याचं स्पष्ट झालं.

या प्रकरणाचा सखोल तपास सुरू केल्यानंतर धक्कादायक माहिती समोर आली. दिलीप राजगुरू यांचा स्वतःचा मुलगा विलास राजगुरू (वय १९) यानेच आपल्या एका साथीदाराच्या मदतीनं ही हत्या केल्याचं उघड झालं. पोलिसांनी संशयाच्या आधारे विलासला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यानं गुन्ह्याची कबुली दिली. या हत्येमागील कारण ऐकून सर्वांनाच धक्का बसला आहे.

या घटनेमुळे रुई गावासह संपूर्ण जालना जिल्हा हादरला आहे. नात्यांमधील वाढता दुरावा आणि संताप किती टोकाला जाऊ शकतो, याचं हे भीषण उदाहरण असल्याची चर्चा परिसरात सुरू आहे. दरम्यान, तीर्थपुरी पोलीस ठाण्यात आरोपी मुलगा विलास राजगुरू आणि त्याच्या साथीदाराविरुद्ध हत्येचा गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, पुढील तपास वरिष्ठांच्या आदेशावरून तीर्थपुरी पोलीस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक वैशाली पवार यांच्याकडून सुरु आहे.

**नेमकं काय घडलं?**

विलासच्या आईचं म्हणजेच दिलीप राजगुरू यांच्या पत्नीचं काही वर्षांपूर्वी निधन झालं होतं. त्यानंतर ते एकटेच राहत होते. दरम्यान, त्यांनी दुसरं लग्न करण्याचा निर्णय घेतला होता आणि विशेष म्हणजे, विवाहाच्या दिवशीच त्यांची हत्या करण्यात आली. वडिलांच्या या निर्णयाबद्दल मुलगा विलास नाराज होता. वडील दुसरं लग्न करत असल्याचा राग त्याच्या मनात खोलवर घर करून बसला होता. विलासनं रागातून आपल्या एका मित्राच्या मदतीनं वडिलांच्या हत्येचा कट रचला. सकाळच्या सुमारास संधी साधून विलासनं वडिलांवर कुऱ्हाडीनं सपासप वार केले, यावेळी त्यांचा जागीच मृत्यू झाला. विशेष म्हणजे, ज्या दिवशी दिलीप राजगुरू यांच्या नवीन आयुष्याची सुरुवात होणार होती, त्याच दिवशी त्यांचा दुर्दैवी अंत झाला.

# जेवणात केस, पत्नी अन् सासर... छत्रपती संभाजीनगरमधील घटनेने खळबळ, पोलिसांकडून सात जणांना अटक

**अकोल्यात पतीने केली पत्नीची हत्या**

दोन दिवसांपूर्वी अकोल्यातील डाबकी रोड पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका अनोळखी महिलेचा अर्धवट जळालेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आला होता. या प्रकरणी घातपात की अपघात याबाबत विविध तर्कवितर्क लावले जात होते. मात्र, पोलिसांच्या सखोल तपासातून धक्कादायक वास्तव समोर आले आहे. या महिलेची निर्घृण हत्या करण्यात आल्याचे उघड झाले असून, ही हत्या तिच्याच पतीने केल्याची माहिती पोलिस तपासात समोर आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत महिला रविना आणि तिच्या पतीमध्ये नेहमीच कौटुंबिक वाद होत होते. या सततच्या वादाला कंटाळून पतीने तिचा गळा दाबून खून केला आणि मृतदेह निर्जनस्थळी फेकून दिला. तसंच, महिलेची ओळख पटू नये यासाठी आरोपीने तिच्या चेह ्यावर पेट्रोल टाकून जाळण्याचाही प्रयत्न केला. या घटनेनंतर पोलिसांनी तत्काळ तपासाची चक्रे फिरवत आरोपी पतीला अटक केली आहे.

**जळगावावात पतीकडून पत्नीवर धारदार शस्त्राने जीवघेणा हल्ला**

जळगाव जिल्ह्यातील धरणगाव पतीकडून पत्नीवर धारदार शस्त्राने जीवघेणा हल्ला करण्यात आला असून. हल्ल्यात पत्नी गंभीर जखमी झाली आहे. धरणगाव शहरातील मध्ये माता परिसरातील संजय नगर मधील घटना आहे. सोनल दीपक लोंढे असे जखमी पत्नीचे नाव असून गंभीर असल्याने तिला जळगावच्या जिल्हा रुग्णालयात हलवलं आहे. चारित्र्याच्या संशयातून पतीने पत्नीवर धारदार शस्त्राने सहा ते सात वार केल्याची माहिती आहे. दीपक बुधा लोंढे असे पत्नीवर धारदार शस्त्राने वार करणाऱ्या पतीचे नाव आहे.

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

संसार म्हटलं की छोटी मोठी भांडणं होत असतात. अनेकदा ही भांडणं टोकाची होतात, तर काही भांडणं सामंजस्याने मिटवली जातात. पण यातील काही वाद इतक्या क्षुल्लक कारणवारुन होतात, की त्यावर तोडगा काढणंही कठीण होतं. तर काही



वादांमध्ये टोकाचं पाऊल उचललं जातं, ज्यानंतर पश्चाताप करण्याशिवाय पर्याय नसतो. छत्रपती संभाजीनगरमध्ये अशीच एक घटना घडली आहे. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

**नेमकी घटना काय?**

छत्रपती संभाजीनगर शहरातील भावसिंगपुरा भागातील श्रावस्ती कॉलनी परिसरात एक काळीज पिळवटून टाकणारी घटना समोर आली आहे. जेवणात केस सापडल्याच्या क्षुल्लक कारणावरून पतीने पत्नीला बेदम मारहाण केली. यानंतर पत्नीने आत्महत्येचं टोकाचं पाऊल उचललं. पोलिसांनी याप्रकरणी सात जणांना अटक केली आहे.

जेवणात केस सापडल्याच्या क्षुल्लक कारणावरून पतीने केलेल्या अमानुष मारहाणीला आणि सासरच्या सततच्या छळाला कंटाळून 25 वर्षीय विवाहितेने गळफास घेऊन आत्महत्या केली. या प्रकरणी छावणी पोलिसांनी मृत महिलेच्या पतीसह सासरच्या सात जणांना बेड्या ठोकल्या आहेत. ईश्वरी अजय बनकर (25) असं मयत झालेल्या विवाहितेच नाव आहे. तर अजय बनकर, दिनेश बनकर,, दिलीप बनकर, चंद्रमणी बनकर, छाया बनकर, आशिष बनकर आणि गणेश बनकर अशी आरोपींची नावे आहेत.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक – डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय – गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक – डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी – ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com